नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

साभार पोच

मॅजेस्टिक प्रकाशने, मुंबई

१. **आस्वाद** लेखक प्रभाकर पाध्ये, पृ. १८६, मू. १२-५०.

२. **डोंगर म्हातारा झाला** ले. अनिल बर्वे, पृ. १५२, मू. दहा रुपये.

३. **स्वरगंगेच्या तीरी** ले. जी. एन. जोशी, पृ. २०३, मू. वीस रुपये.

४. **संपूर्ण क्रांतीच्या दिशेने : जय प्रकाशजी** ले. वसंत नारगोळकर, मू. पंधरा रुपये.

५. **अथांग** ले. जयवंत दळवी : पृ. १४१ मू. चौदा रुपये.

६. **तो स्वप्न पक्षी** ले. श्रीकांत हलदुले, पृ. ६०, मू. ५ रुपये.

७. **अरुण कोलटकरांच्या कविता** ले. अरुण कोलटकर, पृ. १३१, मू. २० रुपये, प्रास प्रकाशन, ३९ नाथमाधव, कांदीवली (पूर्व), मुंबई-६७.

८. **मृदुली** : ले. पद्मावती जावळे, पृ. ५७, मू. सहा रुपये, प्रकाशक सौ. मालती निंवराज नेहते, बुलढाणा.

९. **नील अंश** ले. अशोक निळकंठ सोनवणे, पृ. ८०, मू. ८ रुपये, निर्मल प्रकाशन, चोपडा, जि. यवतमाळ.

१०. **अलेक्यांड्र पुश्कीन** : ले. डॉ. पंडित आवळीकर, पृ. ८४, मू. सहा रुपये, प्रकाशक : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, विद्यानगर, कोल्हापूर.

११. **पहाट** : ले. निळकंठ महाजन, पृ. ८०, मू. आठ रुपये, नीलकमल प्रकाशन, प्रिंपाळे, जळगांव.

१२. **धून** ले. रे. भ. भारस्वाडकर, पृ. ६८, मू. आठ रुपये, पंकज प्रकाशन, स्टेशन रोड, परभणी.

पॉप्युलर प्रकाशने, मुंबई-३४

१३. **कळ्यांचे निश्वास** ले. विभावरी शिरूरकर, पृ. ११०, मू. ७ रुपये.

१४. **जरीला** ले. भालचंद्र नेमाडे, पृ. २५२, मू. २० रुपये.

१५. **हिंदोळ्यावर** ले. विभावरी शिरुरकर पृ १२६, मू. सहा रुपये.

१६. **मुक्ता** : ले. दुर्गा भागवत, पृ. ९५, मू. सहा रुपये.

१७. **पिंगळावेळ** : ले. जी. ए. कुळकर्णी, मू. २० रुपये.

१८. **जास्वंदी** : ले. सई परांजपे, पृ. ६१, मू. ५ रुपये.

१९. **थँक यु मिस्टर ग्लाड** : ले. अनिल बर्वे, पृ १८६, मू. ७ रुपये.

२०. **प्राचीन भारतीय लिपीमाला** ले. रायबहादूर पं. गौरीशंकर ओझा, मूल्य १३० रुपये, भारतीय साहित्य अकादमी, दिल्ली.

२१. **कुलवृत्तांत** : ले. वृन्दावन दंडवते, पृ. १ ते ५२, मूल्य ६ रुपये, प्रास प्रकाशन, मुंबई.

२२. **रामायण रहस्य** : ले. वाल्मीकी योगी मनोहर, पृ. १ ते १७६, मूल्य ५ रुपये, वैदिक विश्व प्रकाशन, नागपूर.

श्रीवत्स प्रकाशने, वणी

२३. **अमृतझरी** ले. राम शेवाळकर, पृ. ८५, मूल्य सहा रुपये.

२४. **अग्निमित्र** ले. राम शेवाळकर, पृ. १३४, मूल्य दहा रुपये.

२५. **त्रिदल** ले. राम शेवाळकर, पृ. १६६, मूल्य पंधरा रुपये.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेल्या सवलतींच्या दरातील कागद आहे.

ऑगस्ट-सप्टेंबर १९७७
श्रावण-भाद्रपद १८९९

संपादक
वि. बा. प्रभुदेसाई

सहसंपादक :
शिरीष गोपाळ देशपांडे

युगवाणी

मूल्य तीन रुपये) 卐 (वर्ष ३३, अंक ५-६

विदर्भातील साहित्यिकांचा सन्मान

मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष श्री. पु. भा. भावे

पुणे येथे नोव्हेंबर महिन्यात भरणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या बावन्नाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी मान्यवर मराठी साहित्यिक श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे यांची बहुमताने निवड झाल्यामुळे विदर्भातील साहित्यप्रेमी रसिकांमध्ये अत्यंत उल्हासाचे वातावरण निर्माण झाले आहे. कथा, कादंबरी, नाटक, चित्रपटकथा, ललित लेख, वैचारिक गद्य इत्यादी मराठी वाङमयाच्या विविध क्षेत्रांत श्री. भावे यांनी अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. विशेषत: १९४५ च्या सुमारास मराठी कथेने वैशिष्ट्यपूर्ण असे जे एक नवीन वळण घेतले त्याला श्री. पु. भा. भावे यांचा महत्त्वाचा हातभार लागलेला आहे. त्यांच्या 'सतरावे वर्ष', 'पिंपळपान', 'मुक्ती' इत्यादी कितीतरी कथा अजूनदेखील अवीट गोडी प्राप्त करून देतात. किंबहुना श्री. भावे यांना मराठी वाङमयात मानाचे पान लाभले आहे ते एक स्वतंत्र शैलीचा समर्थ कथाकार व प्रभावी गद्यलेखक म्हणूनच. श्री. भावे यांचा झुंजार बाणा त्यांनी सुरुवातीला चालविलेल्या 'आदेश' आणि 'सावधान' या नियतकालिकांमधून जसा प्रगट झालेला होता तसाच तो त्यांच्या अलीकडच्या 'रक्त आणि अश्रू', 'वाकुल्या', 'वाघनखे' इत्यादी लेखसंग्रहांमधूनही प्रत्ययाला येतो. मागे श्री. भावे यांचे महाविद्यालयीन शिक्षण नागपुरातील ज्या हिस्लॉप कॉलेजमध्ये झाले त्याच कॉलेजात पुढे अध्ययन करताना गुरुजनांकडून प्रस्तुत संपादकाला श्री. भावे यांच्या बहुरंगी व बहुढंगी व्यक्तिमत्वाशी निगडित अशा अनेक रंजक आठवणी श्रवण करण्याची संधी लाभलेली आहे. 'प्रथम पुरुषी एक वचनी' या अलीकडे क्रमश: प्रसिद्ध होत असलेल्या श्री. भावे यांच्या आत्मचरित्राचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करायला हवा. नागपूर-विदर्भाच्या कर्मभूमीचा भावे यांना विशेष अभिमान वाटतो.

वर्धा येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अधिवेशनाचे श्री. भावे हे अध्यक्ष होते. महाराष्ट्र शारदेच्या दरबारी श्री. भावे यांचा होत असलेला हा उचित गौरव विदर्भ साहित्य संघाला खरोखरीच भूषणावह वाटतो.

मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर

योगायोगाने विदर्भाच्या दृष्टीने संतोषजनक असा आणखीही एक बहुमान नुकताच लाभला आहे.

श्री. पु. भा. भावे यांच्याप्रमाणे विदर्भ हीच कर्मभूमी असलेले सुप्रसिद्ध नाटककार व नाट्य-दिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांची पुणे येथे डिसेंबर महिन्यात भरणाऱ्या अठ्ठावन्नाव्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी अविरोध निवड झाली आहे. 'वऱ्हाडी मानसं', 'चंद्र नभीचा ढळला', 'कटयार काळजात घुसली' इत्यादी अनेक लहानमोठी नाटके दारव्हेकरांनी लिहिलेली असून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात तर ते 'दारव्हेकर मास्तर' या नावाने नागपुरकरांना सुपरिचितच आहेत. आकाशवाणीवरील नाट्य विभागाचे अधिकारी, त्याचप्रमाणे नागपुरातील नाटचविषयक विविध उपक्रमांचे प्रेरणास्थान या दृष्टीने दारव्हेकरांनी वजावलेली कामगिरी अविस्मरणीय अशीच आहे. नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान होणाऱ्या सन्मित्र दारव्हेकरांचे त्यांच्या एकेकाळच्या सहाध्यायाकडून हार्दिक अभिनंदन.

नेहरू साक्षरता पुरस्कार विजेते श्री. आ. रा. देशपांडे

वैदर्भी साहित्यिकांच्या सन्मानांत शिरपेच ठरणारी ही आणखी एक घटना. कविवर्य 'अनिल' उपाख्य श्री. आत्माराम रावजी देशपांडे यांना भारत सरकारचा १९७७ चा नेहरू साक्षरता पुरस्कार वहाल करण्यात आला आहे. श्री. आप्पासाहेव देशपांडे यांनी भारत सरकारचे समाज शिक्षण विषयक सल्लागार म्हणून वजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीची ही पावतीच म्हणावी लागेल.

श्री. आ. रा. देशपांडे हे मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष असून विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष व सांप्रतचे 'सांगेन गोष्टि युक्तिच्या चार' असा ज्येष्ठ सल्लागाराचा अधिकार प्राप्त झालेले उपाध्यक्ष आहेत. आप्पासाहेवांच्या या प्रस्तुत बहुमानाचा विदर्भ साहित्य संघाला खूपच अभिमान वाटतो.

या तीन्ही साहित्यिकांचे विदर्भ साहित्य संघाकडून मनःपूर्वक अभिनंदन.

———

संपादक – मंडळ

सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुमेदार, वजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. वा. कुंडले.

अंतरंग

तीन लेख

ना. वा. ठेंगडी – **वृत्तपत्रवाचन व वाङ्मयास्वाद : ८१.**
पंडित आवळीकर – **ज्ञानदेवांच्या काव्यातील 'धार्मिक अनुभव' ८५.**
मीना जोशी **इंदिरा संतांच्या काव्यातील विशेषणे : एक अभ्यास ९९.**

सहा कविता

युंसोजा – **वेदना ८४.**
नीळकंठ घोडे – **अग्निपरीक्षा ८७.**
सुधाकर नेर्लेकर – **संध्याकाळ ८८.**
कॅस्केड – **कट्टयावर वसून १०८.**
राजीव प्रभाकर पांडे – **मी जिवंत आहे ११२.**
मधुकर पारळकर – **भावशून्य माझे अस्तित्व गा ! ११२.**

एक एकांकिका

सुभाष सोनवणे – **हृदयाची गाणी ! ८९.**

एक ग्रंथपरीक्षण

द. भि. कुळकर्णी – **सरगम १०९.**
याशिवाय **कार्यवृत्त, साभार पोच.**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृत्तपत्र-वाचन व वाङ्मयास्वाद

—ना. वा. ठेंगडी

एक प्रश्न गेल्या कित्येक दिवसांपासून माझ्या मनात घर करून आहे. तो प्रश्न असा आहे वर्तमानपत्राच्या वाचनाची जी सवय मनुष्याला जडलेली असते तिचा त्याच्या वाङ्मयीन आस्वादनावर काही परिणाम होत असेल काय ? आज अशी एक-सुद्धा सामान्य सुशिक्षित व्यक्ती नसेल, की जी कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्राचे रोज वाचन करीत नसेल. कित्येकांचा दिवस वर्तमानपत्राच्या वाचनाने सुरू होतो तर कित्येकांचा वर्तमानपत्राचे वाचन हा रात्री झोपण्यापूर्वीचा नित्यनेमाचा कार्यक्रम असतो. वर्तमानपत्राचे वाचन विविध अवस्थांमधून होत असते. पहिले पान वातम्यांचे असते. पहिल्या पानावरील ठळक ठळक मथळयांच्या वातम्या वाचताना आजच्या अगदी ताज्या जगाचा एक विशिष्ट संस्कार आपल्या मनावर होत असतो. आज अगदी या घटकेला जगात जे चालले आहे त्याच्या अगदी जवळ आपण आजच्या सकाळच्या अंकात आलेल्या कालच्या वातम्यांद्वारे जाऊन पोचत असतो. जगाशी आपला हा त्यातल्या त्यात जवळचा संपर्क असतो. अर्थात् आकाशवाणीवरून आपण ज्या दिवशीच्या बातम्या त्या दिवशी ऐकतो आणि या अर्थाने जगाशी आपला हा फारच जवळचा संपर्क असतो. परंतु हा संपर्क श्रवणाद्वारे प्रस्थापित झालेला असतो. वाचनाद्वारे त्यातल्यात्यात ताजा संपर्क म्हणजे वर्तमानपत्राद्वारे येणारा संपर्क. सायं-दैनिकांची गोष्ट थोडी वेगळी असते. दिवसभरातल्या वातम्या सायंदैनिकात वाचावयास मिळू शकतात. ज्यांना एवीतेवी संध्याकाळीच वर्तमानपत्र वाचा-यला सवड मिळते, त्यांच्याकरिता सायंदैनिक चांगले.

मूळ मुद्दा जो आहे तो वाचनाद्वारे जगाशी ताजा संपर्क येण्याचा. जगात कोठे काय घडले, एवढे सांगूनच वर्तमानपत्र थांबते काय ? एखादी खुनाची बातमी, कोणी कुठे बुडून मेल्याची बातमी, एखाद्याला अपघात झाल्याची बातमी, एखाद्या नामवंत साहि-त्यिकाच्या घरी चोरी झाल्याची बातमी, एखाद्या वयोवृद्ध राजकारणी माणसाचे एखाद्या तरुण मुलीशी लग्न झाल्याची बातमी, एखाद्याने मरताना आपले डोळे नेत्रपेढीला दान दिल्याची बातमी, एखाद्या गाईला दोन तोंडाचे बछडे झाल्याची बातमी, एखाद्या गिर्यारोहक तुकडीने एखादे शिखर जिंकल्याची बातमी, एखाद्याने वाघाच्या तावडीतून एखाद्या मुलाला सोडविल्याची बातमी—अशा ज्या काही वातम्या असतात त्या तात्कालिक आणि आकस्मिक स्वरूपाच्या असतात. काल घडून गेलेल्या घटनांशी अशा वातम्यांचा संबंध नसतो. त्या बातम्या एकदाच जशा प्रसिद्ध झाल्या तशाच वाचून आपण त्या घटनेसंबंधाचे आपले चित्र पूर्ण करून टाकतो. काही वातम्यांचे तसे नसते. त्या बातम्या विकास पावत असतात. सात दिवसांपूर्वी एक बातमी घडते. सहा दिवसापूर्वीच्या वर्तमानपत्रात ती प्रसिद्ध होते. त्यानंतर त्याच बातमीचा पुढला भाग सहा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिवसांपूर्वी घडतो व तो घडलेला भाग पाच दिवसांपूर्वीच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होतो. अशा रीतीने ती वातमी 'डेव्हलप' होत जाते आणि आजच्या वर्तमानपत्रात त्या बातमीच्या 'डेव्हलपमेंट' मधील अगदी ताजी अवस्था असते. सामान्यत: राजकीय बातम्या या अशा डेव्हलप होत जाणाऱ्या बातम्या असतात. अगदी अलिकडे आपल्या देशात जे महान् राजकीय परिवर्तन घडून आले त्याचा सारा इतिहास बातम्यांमधून नोंदवला गेला आहे. एखाद्या बँक कारकुनाने बँकेच्या पैशाची अफरातफर करणे ही घटनासुद्धा वेगवेगळ्या अवस्थांमधून 'डेव्हलप' होऊ शकते. त्या कारकुनाचे फरार होणे, नंतर तो पोलिसांच्या हाती लागणे, पोलिसांजवळ त्याने दिलेल्या जबानीत गावातील एखाद्या लब्धप्रतिष्ठित माणसाचे नाव गोवले जाणे, त्याच सुमाराला एखाद्या तलावात एखादे प्रेत सांपडणे आणि ते ज्याचे आहे त्याचा त्या लब्धप्रतिष्ठित माणसाच्या विरुद्ध गोळा होऊ पाहणाऱ्या पुराव्यात महत्वाचा भाग असणे, यातून मग दुसरेच एखादे प्रकरण वर येणे—असा काहीसा विकास एखाद्या बातमीचा होऊ शकतो. चोरटा, बेकायदेशीर व्यापार करणाऱ्या एखाद्या आंतरराष्ट्रीय टोळीचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याच्या बातमीतूनही घटनांची अशीच एखादी लांबण घडू शकते.

बातमीचा हा जो विकास घडत जातो किंवा बातम्यांद्वारे प्रकरणांच्या घटनांची ही जी साखळी जुळत जाते, तिचे कथा या वाङ्मयप्रकाराशी पुष्कळसे साम्य असते. वरेचदा तर असे होते की, एखादा कसलेला कथाकार आपल्या कथेत ज्या कौशल्याने घटनांची गुंफण करतो त्याहून कितीतरी अधिक कौशल्याने गुंफण केलेल्या वाटाव्या अशा या वर्तमानपत्री कथा असतात. या कथा सर्वच प्रकारच्या असतात. युद्ध पेटल्याच्या असतात, ते शांत झाल्याच्या असतात. एखाद्या राजकारणी व्यक्तीच्या भाग्याचा तारा यातून चढताना आणि उतरताना दिसतो. स्मगलर्सच्या टोळीच्या प्रमुखाच्या शिताफी या कथांमध्ये असतात. तर याच कथांमध्ये तो प्रमुख आपल्या थोड्याशा बेसावधपणामुळे पोलिसांच्या जाळ्यात कसा अडकतो, याचीही हकिकत असते. या कथांच्या जोडीला वर्तमानपत्रांचे त्या कथांवरचे अग्रलेख असतात आणि इतरही लेख असतात व हे अग्रलेख व लेख या कथांविषयीच्या आपल्या संवेदना अधिक गडद करीत असतात. मला असे म्हणावयाचे आहे की, वर्तमानपत्री कथानकांच्या संवेदनांनी संवेदनाचे एक स्वतंत्र विश्वच आपल्या मनात तयार केलेले असते. आपल्याला नकळत ते तयार झालेले असते, ही गोष्ट खरी आहे, परंतु ते तयार झालेले असते, ही गोष्ट मात्र निश्चित. ते चेतन मनाच्या पातळीवर नसले, तर अचेतन मनाच्या पातळीवर असते, पण ते असते.

आता, या विवेचनाच्या सुरुवातीला मी उपस्थित केलेला प्रश्न अधिक स्पष्ट झालेला आहे. वर्तमानपत्रांच्या नित्य वाचनातून जे संवेदनांचे एक वेगळे विश्व आपल्या मनात तयार झालेले असते, ते आपल्या वाङ्मयीन आस्वादनावर काही परिणाम करते काय ? या प्रश्नातील 'आपल्या' याचा अर्थ व्यक्तीच्या आणि ही व्यक्ती अशी की, जिला वाङ्मयीन आस्वादनाचे अंग आहे. हे अंग असल्याची अट पूर्ण होत असेल तरच या प्रश्नाला काही अर्थ आहे. वर्तमानपत्राच्या वाचनातून तयार झालेले संवेदनांचे वेगळे विश्व वाङ्मयाच्या आस्वादनावर परिणाम करते, असे मला वाटते. मी स्वत:ला असा एक प्रश्न विचारू शकतो की, श्री अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' ही कादंबरी ज्या लोकांना आवडली, त्यांना ती निश्चित कशामुळे आवडली ? या लोकांच्या बाबतीत असेच घडले नाही काय की, वर्तमानपत्राच्या नित्य वाचनामुळे त्यांच्या मनात तयार झालेले संवेदनेचे एक वेगळे विश्व आणि 'मुंबई दिनांक' मधून साकार झालेले विश्व यांचा सांधा कुठेतरी जुळला ? या दोन विश्वांचा सांधा जुळला, तेव्हाच हे आवडणे शक्य झाले. 'मुंबई दिनांक' मध्ये वर्तमानपत्राला दिसणारे मुंबईचे एक जग आहे. मुख्य मंत्री आहे, कामगार नेता आहे, कामगार नेत्याची प्रेयसी आहे, कामगार चळवळ आहे, स्मगलर आहे, स्मगलरांचा माग घेणारे पोलिस आहेत, बातमी मिळविणे आहे, ती मिळवून छापणे आहे—आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बातम्या मिळवून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

आणणाऱ्या ज्या वार्ताहाराबद्दल वर्तमानपत्राच्या वाचकाला सदैव कुतूहल असते तो वार्ताहर त्याच्या पूर्ण दिमाखानिशी आहे. श्री. अरुण साधू स्वत: एक कसलेले पत्रकार आहेत आणि म्हणून वर्तमान-पत्रांच्या नित्य वाचनाने तयार झालेल्या संवेदनाच्या वेगळ्या विश्वाशी आपल्या कादंबरीतील विश्वाची लय साधणे त्यांना सहज शक्य झाले आहे.

वर्तमानपत्री संवेदनेचे हे वेगळे विश्व जिच्याशी अगदी सहज तादात्म्य पावू शकते, अशी आणखी एक कादंवरी म्हणजे 'प्रतिनिधी'.

श्री. वसंत वरखेडकर यांच्या या कादंवरीमध्ये दिल्लीतील राजकीय वर्तुळाचा कानोसा आहे. ज्या काळात ती कादंवरी प्रसिद्ध झाली, त्या काळातील दिल्लीच्या राजकारणाने जी प्रश्नचिन्हे उभी केली होती, ती लेखकाने कादंवरीत मांडली होती आणि उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला होता. श्री. वसंत वरखेडकर हे अनेक वर्षे प्रेस इन्फर्मेशन ब्यूरोमध्ये अधिकारी होते आणि त्या नात्याने त्यांचा वर्तमान-पत्राच्या सृष्टीशी फार जवळचा संबंध आला होता. त्यामुळेच ते आपल्या कादंवरीत अशी सृष्टी निर्माण करू शकले की, जिची लय वाचकाच्या वर्तमानपत्री संवेदनेच्या लयीशी अगदी सहज जुळू शकली. वर्तमानपत्राच्या नित्य वाचनाने जगाशी ताज्यातला ताजा संपर्क प्रस्थापित होणे, या संपर्कातून मनात एक वेगळे संवेदनाविश्व तयार होणे आणि हे संवेदनाविश्व जगात प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांशी संबंधित असल्यामुळे सामान्य वाङमयीन संवेदनाविश्वापेक्षा अधिक चैतन्यमय असणे—हा प्रकार नीट समजून घेतला पाहिजे. श्री. वसंत कानेटकर यांचे 'बेईमान' नाटक ज्या काळात गाजले, तो काळ वर्तमानपत्रां-मधून मालक-मजूर संबंधांविषयीच्या विशिष्ट संवेदना साकार होण्याचा काळ होता. एक मोठा उद्योग, त्या उद्योगातील कामगारांची संघटना, त्या संघटनेत मालकाविरुद्ध असलेला असंतोष, कामगारांची संघटना फोडून त्यांच्यातील असंतोषाची हवा काढून घेण्याचे मालकाचे कारस्थान या 'बेईमान' मधील घडामोडींना माणसाच्या वर्तमानपत्री संवेदनांच्या विश्वाने तावडतोब प्रतिसाद दिला. 'कोंडी' नाटक आणीबाणीच्या काळात मनाची पकड घेऊन गेले. आणीबाणीमुळे माणसाच्या वर्तमानपत्री संवेदनांच्या विश्वाची जी उपासमार चालली होती, तिची सांगड 'कोंडी' शी बरोबर घातली गेली. श्री. अनिल बर्वे यांची 'थँक्यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी लोकप्रिय झाली ती तिच्यातील नक्षलवाद्यामुळे. नक्षलवादी कसे असतात याची वाचकांना कल्पना आहे. नक्षलवाद्याविषयी ताज्यातील ताजी चैतन्यपूर्ण संवेदना त्याच्या मनात जागी आहे म्हणून तो नक्षल-वाद्याच्या हौतात्म्याची कादंबरी डोक्यावर घेऊन नाचतो आहे.

यातून एक अडचण संभवते. वर्तमानपत्रांच्या वाचकांचे वर्तमानपत्री संवेदनाविश्व प्रत्येक दिवशी ताजे होत जाणार आहे. कालच्यापेक्षा आज अधिक ताजे व आजच्यापेक्षा उद्या त्याहून ताजे, हे असेच जर ताजे होत जाणार असेल—आणि ते होणार आहे—तर आज या संवेदनाविश्वाचा सांधा ज्या कलाकृतीशी बरोबर जुळतो त्या कलाकृतीशी तो उद्याही जुळेलच याची काय खात्री? काळ जसजसा पुढे जाईल, तसतसा या कलाकृती मागे पडतील काय? मला तसे होण्याची शक्यता फार वाटते. 'मुंबई दिनांक', 'प्रतिनिधि', 'थँक्यू' या ज्या विशिष्ट प्रकारच्या कादंबऱ्या आहेत त्यांना मी 'वर्तमानपत्री कादंबऱ्या' म्हणतो. मराठीतील वर्तमानपत्री कादंबरी नक्की केव्हा सुरू झाली, ते मला सांगता येणार नाही; परंतु फार वर्षे आधी लिहिली गेलेली मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' ही कादंबरी मला वर्तमानपत्री कादंबरीच्या कक्षेत आणता येईल. कितीतरी वर्षे आधी लिहिल्या गेलेल्या या कादंबरीला मराठीतील वर्तमानपत्री कादंबरीचे उगमस्थान म्हणता येईल काय? तिला तो मान जरी आपण देऊ शकलो तरी पुढे सरकत गेलेल्या काळाबरोबर ती कादंबरी आपली लोकप्रियता गमावत गेली, ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. श्री. श्री. ना. पेंडसे यांची 'लव्हाळी' ही कादंबरी वर्तमान-पत्री कादंबरी म्हणता येईल. पण त्या कादंबरीनेही काळाच्या ओघात, आपले आकर्षकत्व गमावले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'मुंबई दिनांक', 'प्रतिनिधि', 'थँक्यू', 'बेईमान', 'कोंडी' इत्यादी कलाकृतींच्या वाटचालाही हेच नशीब येण्याची शक्यता आहे. कठोर असले, तरी हे सत्य आपण स्वीकारले पाहिजे.

शेवटी काही प्रश्न. वर्तमानपत्राच्या नित्य वाचनातून जे एक ताजे चैतन्यपूर्ण संवेदनाविश्व तयार होत असते त्यानेच जर कधीकाळी वाङ्मयाच्या आस्वादकाचे मन पूर्णपणे व्यापून टाकले, तर काय होईल? ज्या वाङ्मयीन कलाकृतीमध्ये वर्तमानपत्री संवेदनांचे प्रतिसाद उमटणार नाहीत, त्या कलाकृती सरळ सरळ नाकारण्यात येतील काय? वाङ्मयीन कलाकृती निर्माण करणे हे पुढे पुढे अगदी निवडक लोकांनाच पेलवणारे काम होऊन बसेल काय?

वेदना

गरीबीच्या वेदना पापाहून महाशापित आहेत
भुकेच्या वेदना विषाहून भयाण दूषित आहेत
कष्टाच्या वेदना निखाऱ्याहून क्रुद्ध आहेत
अशातच रक्तक्रांतीचे पाट पाण्याहून पवित्र आहेत.

मुद्दाम कुस्करलेल्या लोकांनो, एक या रे!
छेवलेल्या, विव्हळणाऱ्या आयुष्यांनो, एक या रे!
तुमची थरथरणारी मने, वंशावंशाला शापीत आहेत
तुमची विझलेली मने जीवनाला करकचून खात आहेत
तुमच्याच रक्ताच्या सोनुल्यांना जीवन देण्या शहीद व्हा रे
माणुसकीच्या हक्कासाठी पेटा नी पेटवून घ्या रे
अन्यथा, हे जीवन मस्त सांडाच्या टाचांना बांधलेली फरकड आहे
अशातच रक्तक्रांतीचे पाट पाण्याहून पवित्र आहेत.

लपवू नका ह्या वेदना, एक नाही, हजारो आहोत—
साहू नका हा अन्याय, एक नाही, हजारो आहोत
हजारोंच्या लोंढ्यातून विक्राळ-विराट पुरुष निर्मू या
प्रलयाची वार्ता नको, जुलमीयांना कराल धारेवर चिरू या
निसर्ग-प्रकृतीने हेच केले, विज्ञानाचा तो अधिकार आहे
'विक्राळ पुरुषाच्या' आवाहनाला, जीवन हे कुर्बान आहे
अन्यथा, आपले जीवन प्रेतावरील भंगरलेले मडके आहे
अशातच रक्तक्रांतीचे पाट पाण्याहून पवित्र आहेत...

—युसोजा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानदेवांच्या काव्यातील 'धार्मिक अनुभव'

—पंडित आवळीकर

पुष्कळदा 'काव्य' आणि 'धर्म' या परस्पर-विरोधी संज्ञा आहेत असे समजले जाते. काव्य जेव्हा 'धार्मिक' वनते तेव्हा ते स्वतःच्या काव्य'धर्म' हरवून वसते असे समीक्षकांना वाटते. त्याउलट 'धर्मा'ला न्याय दिला नाही म्हणून धार्मिक काव्याला दूषण देण्याची शक्यता तत्वज्ञांच्या बाबतीत असते. पण ज्ञानदेवांसारख्या आध्यात्मिक कवीच्या काव्यात्म आणि धार्मिक संवेदनांचा कलात्मक मिलाफ अशा परस्पर विसंगतींचा मेळ घालतो तेव्हा तो चमत्कारच ठरतो.

ज्ञानदेवांच्या 'धार्मिक अनुभवा'चे स्वरूप आणि त्याच्या आविष्काराची पद्धत यांची, बारीक तपशिलात न शिरता, पाहणी करण्याचा माझा विचार आहे. मूलभूत प्रश्न आहेत ते असे 'अनुभव' म्हणजे काय ? 'धार्मिक अनुभव' म्हणजे काय ? हा 'अनुभव' 'काव्यात्म' कसा बनतो ?

ए. ई. टेलरच्या शब्दांत सांगायचे तर, 'अनुभव' म्हणजे—"Immediate feeling or apprehension of Reality" or "of the whole of existence. . . . by a completed insight." त्यालाच अन्हेनारिअसने 'शुद्ध' ('Pure') अनुभव म्हटले. विल्यम जेम्स् सांगतो त्याप्रमाणे धर्म म्हणजे व्यक्तीचे तिच्या मते जे दिव्य (Divine) आहे त्याच्याशी असणारे नाते. 'धार्मिक अनुभव' म्हणजे मनाच्या दिव्यावस्थेत झालेला सत्याचा घनगहन साक्षात्कार.

ज्ञानदेवांचा 'अनुभव' हा विश्व आणि देव यांच्या एकात्मतेचा सुखद प्रत्यय आहे. त्यांना सबंध विश्व हा सत्याचा आविष्कार वाटतो : ती माया नव्हे. त्यांचा 'चिद्विलासवाद' किंवा 'स्फूर्तिवाद' हा ('ज्ञानदेवी' आणि 'अमृतानुभवा-' मध्ये आढळणारा) स्वतःच्या 'धार्मिक अनुभवा'ला सिद्धांतरूप देण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न नव्हे तर तो प्रत्यक्ष 'अनुभव'च आहे. एम्. पी. सबातेरने 'सांप्रदायिक' (Institutional) आणि 'वैयक्तिक' (Personal) धर्म यांतील भेद सांगताना पहिल्याचे लक्ष 'दिव्या'वर तर दुसऱ्याचे खुद्द 'माणसा'वरच खिळलेले असते, असे स्पष्ट केले आहे. ज्ञानदेवांनी दोन्ही गोष्टी एकाचवेळी डोळ्यांसमोर ठेवल्या. खरे म्हणजे, त्यांनी 'दोहों'त 'एक' पाहिले; त्यांच्या बावतीत विश्व आणि देव यांच्या एकात्मतेचा 'अनुभव' ही अक्षय 'समाधी' होती : कधी न संपणारी दिव्यानंदावस्था होती. हा दिव्यानंद, हा 'अमृतानुभव' त्यांचा 'अनु व' आणि त्याचा 'आविष्का‍र' यांचा अगदी गाभाच आहे. या सुदीर्घ समाधीत, त्यांच्या मुखातून जे जे बाहेर आले ते ते हेवा करावा अशा काव्याच्या उंचीपर्यंत जाऊन भिडले. ज्ञानदेवांनी काव्य 'रचने'ची धडपड अशी केली नाही. स्वतःच्या श्रोतृवृंदाशी, अत्यंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्स्फूर्त पद्धतीने, ते संवाद करीत आणि साधत गले. त्यांच्या 'अनुभवा'चे विशिष्ट स्वरूप आणि मौखिक निवेदनाची विशिष्ट रीत यांनी त्यांचा 'अनुभव' आणि 'आविष्कार' 'काव्यात्म' बनवला.

टी. एस्. इलियटचा एक शब्दप्रयोग वापरून असे म्हणता येईल की,'Unification of sensibility' चे बुद्धी आणि भावना एकवटण्यात ज्ञानदेवांना साहाय्य झाले. 'ज्ञानदेवी' ही 'भगवद्गीते'वरील टीका आहे असे मानतात. पण ती निश्चितपणाने 'टीके'हून अधिक काही आहे असे मला वाटते. 'ज्ञानदेवी' ही केवळ 'गीता-टीका' नव्हे तर 'संसृति-टीका' (Criticism of life) पण आहे. अशा प्रकारे तिला काव्यरूप प्राप्त होते. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, ज्ञानदेवांच्या 'अनुभवाला' व्यक्त करण्यासाठी 'गीता' हे निव्वळ साधन किंवा निमित्त बनले आहे. 'ज्ञानदेवी'चे पर्यायी नाव 'भावार्थदीपिका' आहे आणि ते टी. एस्. इलियटच्या "A recreation of thought into feeling" या शब्दांशी समानार्थक आहे. इन्च्या बाबतीत विचार हा अनुभव बने हे टी. एस्. इलियटचे विधान ज्ञानदेवांबाबतदेखील खरे आहे.

ज्ञानदेवांच्या 'अनुभवा'तील भावनिक आशयाने त्यांना साहजिकच भाषेचा भावप्रधान उपयोग ('emotive use of language') करायला प्रवृत्त केले. देवाबद्दल भक्ती आणि 'माणसा'बद्दल (सर्व प्राणिजाताबद्दलच)—प्रीती हे त्यांच्यापुरत्या समंधात आणि समतोल मनाचे प्रमुख विशेष होते. त्यांचे मन हे 'शांत' आणि 'अद्भुत' यांच्या मधुर मीलनाचे विरळ उदाहरण होते. अशा प्रकारच्या मनात घोळलेल्या अनुभवाने स्वाभाविकच ते गुणविशेष आत्मसात केले होते आणि त्याचा आविष्कार साहजिकच त्या गुणांनी समृद्ध झाला होता.

आईवडिलांबद्दलचे प्रेम ही ज्ञानदेवांतील एक प्रबळ भावना होती. लहान वयातच, अत्यंत करुण तऱ्हेने ते आईवडिलांना पारखे झाले होते. सनातनी समाजाकडून झालेल्या छळाचा परिणाम म्हणून त्यांचे आईवडील ज्ञानदेवांना व त्यांच्या भावंडांना नाइलाजाने सोडून गेले तेव्हा ज्ञानदेवांनी जिवाचा आकांत केला असेल. हाच 'आकांत' त्यांच्या 'अभंग' आणि 'विरहिणी' या गीतात्म लेखनात, जिथे ते "गे माये !" असे म्हणून 'दिव्य जननी'ला (Divine Mother) वरचेवर संबोधतात, तिथे विलक्षण माधुर्याने प्रतिध्वनित झालेला आहे. ज्ञानदेवांचे आईवडिलांबद्दलचे प्रेम आणि देव व दिव्य जननी ही जगाची मातापितरे आहेत ही त्यांची नितांत श्रद्धा 'बापरखुमादेवीवरू विठ्ठलु' या त्यांच्या मुद्रिकेतूनदेखील मुखरित होते. 'देवो-देवी' ही "जगाची जनके" आहेत असे वर्णन ते 'अमृतानुभवा'त करतात. नुसता देवच नव्हे, तर स्वतःचा श्रोतृवृंदही त्यांना मायबापांसारखा दिसत असतो. 'विरहिणी' मध्ये आपल्या प्रियकराशी मीलन व्हावे म्हणून झुरणाऱ्या वियुक्तप्रियेची भूमिका ते घेतात याबद्दल संशय नाही. पण आईवडिलांबद्दलचे प्रेम हा त्यांचा स्थायी भाव आहे. त्यांच्या बाबतीत अगदी पवित्र भाव आहे. त्यांच्यापाशी हृदयाचा स्त्रीसदृश हळुवारपणा आहे (म्हणूनच त्यांना 'ज्ञानेश्वर माउली' असे लोकप्रिय आणि अचूक नाव दिले गेले) आणि डोक्याचा पुरुषी कणखरपणा आहे. "Genius is bisexual" या उक्तीचे ज्ञानदेव हे अत्यंत चांगले उदाहरण आहे, या वा. ल. कुलकर्णी यांच्या विधानाशी मी सहमत आहे.

भाषेचा भावप्रधान उपयोग हा अशा प्रकारच्या अनुभवाला अत्यंत योग्य होता. नुसते अलंकार म्हणून ज्ञानदेवांनी उपमा आणि रूपके वापरलेली नाहीत. तिथे उपमा आणि रूपके 'objective correlatives' म्हणून कार्य करतात आणि आपल्या मनात त्याच भावनेची जागृती (Evocation) करतात. म्हणूनच 'आविष्कार' 'अलंकारिक' बनण्याऐवजी खऱ्याखुऱ्या अर्थाने 'काव्यात्म' बनतो.

ज्ञानदेवांचा 'आविष्कार' हा नेहमीच अर्थपूर्ण असतो अर्थ (sense), भाव (feeling), सूर (tone) आणि उद्देश (intention) या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चारही अर्थप्रकारांनी 'अर्थगर्भ' असतो. या भर घालणाऱ्या अर्थांच्या (contributory meaning) कलात्मक संघाताने, संकलित अर्थाने त्यांचा 'आविष्कार, 'काव्यात्म' होत असतो. त्यांचा 'अनुभव' हा स्वतःच 'भाव' आणि 'अर्थ' यांचा सुरेख संगम असतो. आय्. ए. रिचर्डसच्या पावलांवर पाऊल टाकून पुढे असेही म्हणता येईल : ज्ञानदेवांचा 'सूर' स्वतःच्या श्रोतृवृंदाविषयीचा त्यांचा शालीन, स्नेहल आणि आदरपूर्ण दृष्टिकोण प्रकट करत असतो. त्यांचा 'सूर' त्यांच्या 'आविष्कारा'ला प्रसन्न बनतो तर त्यांचा 'आनंदाचा आवारू मांडू जगा' हा 'उद्देश' त्यांच्या 'आविष्कारा'ला उदात्त बनवतो.

ज्ञानदेवांचा 'अनुभव' आणि 'आविष्कार' हे अलग राहात नाहीत ते सुसंवादी असे साकल्य निर्माण करतात. कालिदासाच्या 'वागर्थाविव संपृक्तौ' प्रमाणे किंवा स्वतः ज्ञानदेवांच्या 'देवो देवी-' प्रमाणे ते अविभक्त आहेत. खास त्यांचा स्वतःचा असा विशिष्ट 'नाद' आहे आणि त्यासाठी ओवी-सारखा छंदोप्रकार हा अत्यंत समर्पक आहे. इथे, वा. ब. पटवर्धन यांचे एक अवतरण मी उद्धृत करतो—"With Jnanadeva the Ovi trips, it dances, it whirls,......it takes long jumps, it halts and sweeps along, evolves a hundred and one grace of movement at the master's command. In the music of sound too it reveals a mysterious capacity of manifold evolution".

गूढ अंशाप्रमाणेच नादमधुर आविष्कार हा ज्ञानदेवांच्या 'अनुभवा'ला गीतात्मतेप्रमाणेच महाकाव्यात्मतेच्या उंचीवर चढवतो. एका इटालिअन गूढवाद्याने म्हटले आहे "The true monk takes nothing with him but his lyre." एका दिव्य गीताचा श्रेष्ठ गायक या नात्याने ज्ञानदेवांजवळ त्यांच्या वीणेखेरीज काहीच नव्हते. त्यांना जाऊन सहा शतके उलटली असली तरी, त्यांची वीणा मूक झालेली नाही अजनही ती कंपन पावते आणि 'एकटयाची एकटयाकडील झेप' ('the flight of the alone to the alone') झंकारत राहते.

अग्निपरीक्षा

सांजरातीची वेळ
दिवस पाठीवर ओझे घेउन टळलेला
उरलेला निश्वास
आशेचे मोल देऊन घेतलेला
जन्मतः मिळालेले कर्णासारखे दान
टमरेल अन् कुडचा
(देवा तुझा ऋणी आहे !)
अन्...
अधास्वळ लागलेल्या प्रत्येक दिवसाला
देतो आहे अग्निपरीक्षा
पोटातील आगीवर
केवळ या पोटासाठी...

—नीळकंठ घोडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संध्याकाळ :

हो संध्याकाळ
फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारासारखी
रोज मला भेडसावते
उद्याचा सूर्य उगवण्यापूर्वीच
पायाखालच्या फळ्या निसटून
एक कलेवर टांगतं लटकणार;
डोळ्यांच्या आरपार
मनाच्या झाडावरचा मोहर सुकत जाणार
सगळंच अर्धवट—
हे समोरचं झाड आहे ना
तिथं रोज येऊन बसतात पक्षी
त्यांच्या डोळ्यांत असतात प्रतिबिंबं
क्षितिजांची, आभाळांची
कित्येक मात्र मुकेच असतात
त्यांना जवळ घ्यावं वाटतं आणि त्याचवेळी
ही संध्याकाळ
समोरच्या घराच्या कौलावरून मला भेडसावते
झाड काळं ठिक्कर होतं
पक्षी तसेच गोठून जातात
आता संध्याकाळ पूर्णपणे माझ्यात उतरते
आणि मी संध्याकाळच्या डोळ्यांनीच
घरातला दिवा लावतो.

—सुधाकर नेर्लेकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हृदयाची गाणी........!

—सुभाष सोनवणे

(फोनची बेल...)

सतीश जोशी हॅलो हॅलोऽ... मी सतीश जोशी बोलतोय... सतीश जोशी मला श्रीकृष्ण दीक्षितांशी बोलायचंय. कामात आहेत ते? ...पण.. हॅलो. . आपण कोण... सेक्रेटरी?... हॅलो, नाही— ते मला ओळखत नाहीत, पण... नाही, तुमच्याशी नाही.. श्रीकृष्ण दीक्षितांशीच बोलायचंय मला... प्लीज्... सेक्रेटरी, प्लीज्. कामाचं स्वरूप सांगता येणार नाही मला... मला त्यांच्याशीच बोलायला हवंय! ...पण ते मोकळे केव्हा भेटतील? ठीक आहे. मी पुन्हा फोन करून बघेन.

(अंधार...फोनची बेल्... उजेड येतो, तेव्हा— काही दिवस गेलेले.)

श्रीकृष्ण दीक्षित (फोन घेत..) हॅलोऽ...

सतीश जोशी श्रीकृष्ण दीक्षित का—?

श्रीकृष्ण दीक्षित येस्, स्पीकिंग्! ...आपण?

सतीश जोशी मी— सतीश जोशी!

श्रीकृष्ण दीक्षित कोण सतीश जोशी? मी ओळखलं नाही.

सतीश जोशी हो, आपण मला ओळखत नाही— पण.

श्रीकृष्ण दीक्षित गेले काही दिवस फोनवर वारंवार सतावत असता तुम्ही! माझ्या सेक्रेटरीनं सांगितलं मला—

सतीश जोशी नाही, मी सतावत वगैरे नाही—

श्रीकृष्ण दीक्षित मग—

सतीश जोशी तुम्हाला त्रास देण्याचा हेतू नाहीये माझा, हो खरंच—

श्रीकृष्ण दीक्षित : मुद्याचं बोला—

सतीश जोशी मी माझं नाव... सतीश जोशी—

श्रीकृष्ण दीक्षित समजलं! ... पुढे?

सतीश जोशी पुढे? पुढे काय?

श्रीकृष्ण दीक्षित : कमाल करताय—

सतीश जोशी मी? छे! कमाल तर तुम्ही करताय!

श्रीकृष्ण दीक्षित तुम्हाला म्हणायचंय तरी काय?

सतीश जोशी मला म्हणायचंय मला म्हणायचंय की...! ...पण मला जे म्हणायचंय, ते मी बोलूनच दाखवायला हवं का? तुम्हीच समजून घ्या ना—

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही न बोलताच?

सतीश जोशी हो! .. न बोलताच समजायला हवं तुम्हाला ते—

श्रीकृष्ण दीक्षित : कसं काय?

सतीश जोशी वेव्हलेंग्थ जुळवून घ्यायची, की बस—!

श्रीकृष्ण दीक्षित : वेव्हलेंग्थ...?

सतीश जोशी हो, तुमची-माझी वेव्हलेंग्थ अेक आहे! ... ती तुम्ही जुळवून घेतलीत, तर मी न बोलताच माझं म्हणणं तुम्हाला समजू शकेल...

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही मूर्ख...महामूर्ख दिसताय—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी असं काय करताय ?

श्रीकृष्ण दीक्षित : इनफ् ऑफ युवर धिस् फूलिश्नेस नाऊ !

सतीश जोशी अहो, पण माझं अैकून तरी घ्या—

श्रीकृष्ण दीक्षित आता अेक शब्दही अैकणार नाही—

सतीश जोशी ठीक आहे नका अैकू ... पण माझं म्हणणं समजेल तुम्हाला, मी न बोलता समजेल फक्त वेव्हलेंग्थ जुळवा—

श्रीकृष्ण दीक्षित : हेल् विथ् युवर वेव्हलेंग्थ ! — (फोन आदळतो)

(... अंधार . फोन्‌ची बेल् . उजेड येतो, तेव्हा— काही दिवस गेलेले.)

सतीश जोशी : हॅलो ... हॅलोऽ . हॅलोऽऽ . .

श्रीकृष्ण दीक्षित : हॅलो ... श्रीकृष्ण दीक्षित हिअर ..

सतीश जोशी मी सतीश जोशी वेव्हलेंग्थ जुळतेय का श्रीकृष्ण दीक्षित ?

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही माझं डोकं आणि वेळ का खाताहात ?— मी तुम्हाला ओळखत नाही, तुमचा-माझा संबंध नाही, मला तुमच्याशी बोलायची मुळीच इच्छा नाही—

सतीश जोशी पण मला तुमच्याशी बोलायचंय काही— खूप महत्त्वाचं

श्रीकृष्ण दीक्षित : मला अैकायचं नसेल, तर— ?

सतीश जोशी प्लीज श्रीकृष्ण दीक्षित ... प्लीज्

श्रीकृष्ण दीक्षित सरळ शब्दांत बोलणार आहात का ?— वेव्हलेंग्थ वगैरे सोडून !

सतीश जोशी : म्हणजे ? म्हणजे . तुम्ही वेव्हलेंग्थ जुळवण्याचा प्रयत्नच नाही केला ? हृदयांची वेव्हलेंग्थ ? आत्म्यांचा सुसंवाद ... ?

श्रीकृष्ण दीक्षित तुम्हाला साध्या-सोप्या शब्दांत बोलायचंच नाहीये का ?

सतीश जोशी ओ. के. सांगतोच मग मला तुम्हाला एक गोष्ट सांगायचीये ... गोष्ट म्हणजे माझ्या जीवनात घडलेली फॅक्ट् !

श्रीकृष्ण दीक्षित : किती पाल्हाळ लावतायं ? मला खूप कामं आहेत—

सतीश जोशी हो, मला जाणीव आहे— मी जास्त वेळ घेणार नाहीये तुमचा—

श्रीकृष्ण दीक्षित : आटपा लवकर !

सतीश जोशी एक मुलगी होती ...

श्रीकृष्ण दीक्षित होती— ?

सतीश जोशी आय् मीन् आहे !

श्रीकृष्ण दीक्षित अच्छा म्हणजे, तुमच्या संदर्भात ती आता फक्त भूतकाळ म्हणूनच उरलीय !— होय ना ? म्हणजे तुम्ही मला तुमच्या प्रेमभंगाची कहाणी सांगणार आहात ! अॅम् आय् राइट् ? माननीय श्रीयुत सतीश जोशी, आपण मला कां बोअर करताहात ?

सतीश जोशी प्लीज श्रीकृष्ण दीक्षित तुम्ही बोअर् होत असाल, तर क्षमा करा ... पण मला बोलू द्या ! तर, त्या मुलीची गोष्ट—

श्रीकृष्ण दीक्षित आय् अॅम् अेक्स्ट्रीमली सॉरी मिस्टर सतीश जोशी— ऑर् व्हॉटेव्हर् नेम् यू पझेस् ! तुमच्यासारख्या कुणातरी अनोळखी माणसाच्या प्रेमभंगाची रडकी गोष्ट अैकत बसायला मुळीच फुरसत नाहीये मला ! गुडबाय ! !— (फोन ठेवतो .. अंधार फोनची बेल ... पुन्हा उजेड येतो, तेव्हा— काही दिवस गेलेले .)

सतीश जोशी हॅलो

श्रीकृष्ण दीक्षित : हॅलोऽ

सतीश जोशी हॅलो श्रीकृष्ण दीक्षित का ? मी सतीश जोशी मला बोलायचंय आपल्याशी प्लीज्

श्रीकृष्ण दीक्षित : कोण तू ? का सतावतोअेस ? माझा वेळ खाणारा राहू आहेस तू, का केतू ?

सतीश जोशी प्लीज् . . प्लीज् श्रीकृष्ण दीक्षित डोंट् गेट् अेक्सायटेड् . तुम्हाला मी त्रास देत नाहीये मला गोष्ट सांगायचीये फक्त

श्रीकृष्ण दीक्षित गोष्ट ! मुलीची ?

सतीश जोशी हो, त्या दिवशी गोष्ट सुरू होण्याआधीच तुम्ही फोन बंद केला—

श्रीकृष्ण दीक्षित पण मला हे समजतच नाहीये की वर्तमान काळाचा संदर्भ तुटलेली, भूत-काळातली ती तुमची खरीखोटी गोष्ट माझ्या-सारख्या परक्या, अनोळखी माणसाला अट्टा-हासानं सांगण्याचा तुमचा हा दुराग्रह कशासाठी आहे ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी नाही, नाही, नाही ! चुकताहात आपण ! कारण— अेकतर ती मुलगी भूतकाळात उरली असली, तरी वर्तमानकाळ–भविष्यकाळ उल्लंघून, त्रिकाल व्यापून राहिली आहे ! आणि दुसरा महत्वाचा मुद्दा हा की— आपण दोघे परके नाही आहोत, अनोळखी नाही आहोत ! " परिचय, ओळख ह्या नेहेमीच्या संज्ञांच्या खूप अतीत, खूप वेगळं, व्याख्यान करता येणारं असं काहीतरी नातं तुमच्या माझ्यात आहे !

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही काय बडबडताय, हे तुम्हाला तरी समजतंय का ?

सतीश जोशी : अर्थात् . . . तर मूळ गोष्ट— त्या मुलीची ! . . ती . . ती ! अंगातून चांदणं झिरपवणारी तिची ती नजर . . . ! मधाचं स्मित उधळणारे ते अधर . . . ! . . . ते कपाळावर रुळणारं बटांचं रेशमी इंद्रधनुष्य ! तुम्हाला सांगतो . . तिची अेक नजर माझ्याकडे वळली ना, तरी वाटायचं की . . माझ्या अवघ्या अस्तित्वाला मुलायम मोरपिसारा फुलून आलाय ! . पापण्यांआडच्या निळ्या स्वप्नमहालात तिचं पहिलं पाऊल पडलं की हृदयात पालवी बहरून यायची एका हळव्या गुलाबी स्पंदनाला ! . . . फुलपाखरांच्या देशातली परी होती ती गहिवरल्या पहाटे दहिवराच्या चिमुकल्या अंतरंगात उमललेल्या अनामिक थरथरीअेवढी नाजुक कळ्यांच्या निःश्वासासारखी हळुवार !

श्रीकृष्ण दीक्षित अहो श्रीयुत सतीश जोशी, मी पडलो अेक कारखानदार माणूस ! मला तुमची ही भाषा समजत नाहीये ! आणि स्पष्टच सांगायचं, तर— तुमची ही फालतू बडबड अैकत बसायला वेळसुद्धा नाहीये मला—

सतीश जोशी माझी भाषा समजत नाहीये तुम्हाला ? तुम्हाला हृदयाची भाषा समजत नाही ? शक्य नाही हे श्रीकृष्ण दीक्षित ! तुम्ही चेष्टा करताय माझी—

श्रीकृष्ण दीक्षित तुम्हीच माझी चेष्टा करताय ! मी फोन ठेवतोय—

सतीश जोशी जस्ट् अे मिनिट् ! गोष्ट तशीच राहिली—

श्रीकृष्ण दीक्षित पण मला नाहीये अैकायची ती !

सतीश जोशी प्लीज्ज् . . ! तर त्या मुलीच्या प्रेमात पडलो मी ! शुक्लपक्षातल्या चंद्रामारखी, माझ्या मनातली प्रेमभावना वाढतच गेली— पौर्णिमेच्याही पलिकडे ! . . . अनंत . . . असीम . . अमर्याद . ! ! अेक दिवस . . . अेक दिवस मी तिला म्हटलं— " मी तुझ्यावर प्रेम करतोय सर्वस्वानिशी . . . खूप . . . खूप प्रेम करतोय . . . तू माझी होशील ? माझ्याशी लग्न करशील ? " पुढे काय झालं असेल असं तुम्हांला वाटतं श्रीकृष्ण दीक्षित ?

श्रीकृष्ण दीक्षित : दोन पर्याय संभवतात ! तिचा होकार, किंवा नकार ! . . . तुमच्या बाबतीत दुसरा पर्याय संभवला ! तुम्हाला ती नाही म्हणाली ! — अँड् दॅट् वॉज् दि अेंड् ऑफ युवर लव्ह-अफेअर !

सतीश जोशी : इट् वॉज् नॉट् दि अेंड् . . . वास्तविक, तो शेवट असायला हवा होता ! किंबहुना, तिच्या दृष्टीनं तो शेवटच होता ! तिच्या दृष्टीनं ते प्रकरण तिथे संपलं ! तिच्या दृष्टीनं मी भूतकाळात जमा झालो, मी तिच्यावर करीत असलेलं प्रेम भूतकाळात जमा झालं—

श्रीकृष्ण दीक्षित तुमची गोष्ट संपली ना ?

सतीश जोशी नाही ! खरी गोष्ट इथे तर सुरू होतेय—

श्रीकृष्ण दीक्षित : पुन्हा कधीतरी सवडीनं अैकेन मग ती ! आत्ता मला महत्वाची कामं आहेत— (अंधार . . . फोनची वेल् उजेड येतो, तेव्हा—काही दिवस गेलेले . . .)

सतीश जोशी हॅलो, आपण जर श्रीकृष्ण दीक्षित असाल— तर माझी विनंती आहे की प्लीज् फोन डिस्कनेक्ट् करू नका ! गेले काही दिवस माझा आवाज अैकताच तुम्ही फोन ठेवून देताय प्लीज, बोलू द्या मला—

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही अेक फालतू, रिकामटेकडे गृहस्थ दिसता ! स्वतः निरुद्योगी, निष्क्रीय आहात— ते खुशाल असा, पण दुसऱ्यांचा कामाचा वेळ घेण्याचा मात्र कोणताही हक्क नाहीये तुम्हाला ! माझ्यामागे कारखान्याचा व्याप आहे, डोक्यावर कामांचा प्रचंड बोजा आहे— उगीचच्या उगीच फोन करून माझा वेळ घेत जाऊ नका ! — अँड् दॅट्स् ऑल्—

सतीश जोशी तुमचं चिडणं मी समजू शकतो, पण फोन केल्याशिवाय मला रहावतच नाही, त्याला मी तरी काय करू ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीकृष्ण दीक्षित शहरात सतराशेसाठ जणांकडे फोन आहेत—

सतीश जोशी : पण मला तुम्हालाच फोन करावासा वाटतो, तुमच्याशीच बोलावंसं वाटतं !

श्रीकृष्ण दीक्षित : पण का ?

सतीश जोशी : का ? . . . ते मलाही नेमकं माहीत नाहीये, समजत नाहीये ! पण . . . वाटतं . . . वाटतं की मी, म्हणजे सतीश जोशी म्हणजे श्रीकृष्ण दीक्षित आहे . . . आणि श्रीकृष्ण दीक्षित म्हणजे सतीश जोशी आहे !

श्रीकृष्ण दीक्षित : तुम्ही अेक तर वेडे आहात, किंवा माझे वैरी आहात— म्हणन फुकट वेळ घेत असता माझा !

सतीश जोशी वेडा ? नाही, मी वेडा नाही आणि तुमचा वैरीसुद्धा नाही ! मी तुमचा वैरी कसा असेन ? हाऊ कॅन् आय् बी माय् ओन् अेनिमि ? सतीश जोशी जर श्रीकृष्ण दीक्षितच आहे, तर मग ते अेकमेकांचे वैरी कसे असतील ?

श्रीकृष्ण दीक्षित : मला तुमचं बोलणं खरोखरच समजत नाहीये ! पण तुमच्या फीलिंग्ज् जेन्युइन् असाव्यात असं मात्र मला आता वाटायला लागलयं—

सतीश जोशी : थँक्यू ! . . . हल्ली-हल्ली मला सारखं काय वाटत राहातं सांगू ? . . . वाटतं की मी तुमची आरशातली प्रतिमा आहे ! मला तुमच्यावांचून, तुमच्याविरहित स्वतःचं असं अस्तित्वच नाही !

श्रीकृष्ण दीक्षित : मजेदार कल्पना आहे— !

सतीश जोशी कल्पना नाही, वस्तुस्थिती आहे ही ! वस्तुस्थिती आहे ! ! तुम्ही आणि मी वेगळे नाहीच आहोत, आपल्या दोघांत द्वैत असं नाहीच, एक अद्वैत आहे— हो अद्वैत !

श्रीकृष्ण दीक्षित : सतीश जोशी, तुम्ही पुन्हा काहीतरी अवघड बोलायला लागले आहात ! सोपं-सरळ बोला काहीतरी, वाटल्यास त्या मुलीची गोष्ट सांगा— भूतकाळातल्या त्या मुलीची !

सतीश जोशी भूतकाळातल्या मुलीची ? ती भूतकाळात जमा झाली असली, म्हणून काय झालं . . . ? . . त्या भूतकाळाला अनंत भविष्यकाळांचे गर्भ आहेत श्रीकृष्ण दीक्षित !

श्रीकृष्ण दीक्षित : पुन्हा विचित्र बोलायला लागलात ! विचित्र आणि गमतीदार ! ! . . भूतकाळ हा पुल्लिंगी असूनही त्याला गर्भ ? ठीक आहे ठीक आहे— हा तुमचा बैल गाभण तर गाभण, आता महिना कितवा तेही सांगून टाका— !

सतीश जोशी हसण्यावारी घालवू नका श्रीकृष्ण दीक्षित ! खरच सांगतोय मी— त्या भूतकाळाला अंत नाही, तो भूतकाळ अजर आहे . . . अमर आहे . . . सदासतेज आहे ! . . अनंत आहे ह्या विश्वासारखा ! तो भूतकाळ कधीच संपणार नाही, कधीच कोमेजणार नाही, हरवणार नाही स्मरणातून पाकळ्या-पाकळ्यांनी गळून पडणार नाही ! ! . . ती मला सोडून गेली म्हणून काय झालं ? माझं तिच्यावर प्रेम करणं तर ती थांबवू शकत नव्हती ! मी तरी कुठे थांबवू शकत होतो, थांबवू शकतो आहे ? . . . . . . मी तिच्यावर प्रेम करत होतो, प्रेम करतो आहे, प्रेम करत राहाणार आहे . . .

श्रीकृष्ण दीक्षित : मग मला खात्रीनं वाटतं की तुमच्या ह्या निस्सीम, अमर्याद प्रेमाला ती नक्कीच प्रतिसाद देणार !

सतीश जोशी पण माझी ती इच्छा नाही, अभिलाषा नाही ! . . तिच्यापासून कुठलीच अपेक्षा नाहीये माझी ! कसलीही आसक्ती नाहीये मला तिच्याबद्दल ! मी तिच्यावर प्रेम करतोय, खूप प्रेम करतोय— आणि एवढच मला पुरेसं आहे !

श्रीकृष्ण दीक्षित : ह्याचा अर्थ, तुम्ही ते प्लॅटॉनिक् की काय— ते प्रेम करता, नाही का ?

सतीश जोशी प्रेमाच्या ह्या प्लॅटॉनिक् वगैरे ज्या वेगवेगळ्या व्याख्या आहेत, त्या मला समजत नाहीत ! खरंच समजत नाहीत ! . . माझ्या प्रेमाचं म्हणाल ना, तर ते मनाचं आहेच— आणि त्याचबरोबर शरीराचंही आहे ! येस् ! ! . . . केवळ भावना, किंवा केवळ वासना असं प्रेम मुळी पूर्ण प्रेम असूच शकत नाही ! . . ते अर्धवट असतं ! ! . . माझं प्रेम दोन्ही लेव्हल्स्वर आहे हो !

श्रीकृष्ण दीक्षित : आणि तरी तुम्ही म्हणता— की तुम्हाला तिची कुठलीही आसक्ती नाही, अभिलाषा नाही— असं ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी हो, हेही खरं आहे— आणि तेही खरं आहे! खरंच खरं आहे!!

श्रीकृष्ण दीक्षित इट् सीम्स् टु बी क्वाइट् इंटरेस्टिंग! वरं मग—?

सतीश जोशी मी तिला लग्नाबद्दल विचारलं होतं–

श्रीकृष्ण दीक्षित पण ती नाही म्हणाली, पुढे?

सतीश जोशी तेच तर सांगतो—

श्रीकृष्ण दीक्षित लवकर सांगा, मला उत्सुकता वाटतेय...

(अचानक) हॅलो.. हॅलोऽ... येस् श्रीकृष्ण दीक्षित... दिल्ली कॉल्? ओ. के. ओ. के. सतीश जोशी, फोन ठेवा— दिल्ली कॉल् आहे. नंतर बोलू पुन्हा आपण.. अच्छा... (अंधार... फोनची वेळ... उजेड येतो, तेव्हा—काही दिवस गेलेले)...

श्रीकृष्ण दीक्षित हॅलोऽ, सतीश जोशी का? फोनची वाटच बघत होतो—

सतीश जोशी आयला, हे म्हणजे ग्रेट! गेले चार दिवस रोज फोन करतोय, पण तुमचा पत्ताच नव्हता—!

श्रीकृष्ण दीक्षित अेक्स्पोर्ट लायसन्स्चं काम होतं, दिल्लीला जावं लागलं— आज पहाटेच परतलो...

सतीश जोशी : चार दिवस आपली भेट नाही, अस्वस्थ–बेचैन होतो..

श्रीकृष्ण दीक्षित मलाही तुमच्या फोनची, तुमचं बोलणं अैकायची उत्सुकता होती—

सतीश जोशी : म्हणजे अद्वैताची प्रोसेस् तुमच्याकडूनही हळुहळू सुरू होतेय—

श्रीकृष्ण दीक्षित तुमचं हे बोलणं मला समजत नाही, हे ह्यापूर्वीच मी कित्येकदा तुम्हाला सांगितलंय! ते जाऊ द्या, तुमच्या त्या गोष्टीत पुढे काय झालं ते सांगा—

सतीश जोशी काय होणार? सिनेमात न घडणारं, पण वास्तवात मात्र हमखास घडणारं तेच झालं! . कुठलाही फिल्मी चमत्कार माझ्या बाबतीत झाला नाही! ... मी आपलं माझं अेकतर्फी प्रेम निष्ठेनं करीत राहिलो! ... काही दिवसांनी. तिला.. तिच्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरनं मागणी घातली तोसुद्धा तिच्या प्रेमात पडलेला.

श्रीकृष्ण दीक्षित : हो ... ललिताच्या प्रेमानं वेडा झालो होतो मी तिला मी मागणी घातली.

सतीश जोशी आणि तुम्हां दोघांचं लग्न झालं! अगदी माझ्या देखत !!

श्रीकृष्ण दीक्षित : ह्याचा अर्थ ? ह्याऽचाऽऽ अर्थऽ ?

सतीश जोशी हो मी ललितावर प्रेम करत होतो अजूनही करतोय खूप खूऽप प्रेम ...

श्रीकृष्ण दीक्षित बेशरम इसमा! ती माझी बायको आहे ... आमचं दोघांचं अेकमेकांवर खूप प्रेम आहे आमचा परस्परांवर पूर्ण विश्वास आहे ... आमचं वैवाहिक जीवन अगदी सुखानं चाललंय

सतीश जोशी हे सगळं माहीत आहे मला—

श्रीकृष्ण दीक्षित : आणि तरी तू !. .?..!

सतीश जोशी हो, तरी मी तिच्यावर प्रेम करतोय...

श्रीकृष्ण दीक्षित : निर्लज्ज!

सतीश जोशी : मी तिच्यावर प्रेम करतोय, ह्यात काय निर्लज्जपणा आहे माझा? हे बघ मित्रा, मी तुला आधीच सांगितलंय की ललिताबद्दल मला कसलीही आसक्ती नाही! कुठलीही अभिलाषा नाहीये तिच्याबद्दल माझ्या मनात! मी फक्त प्रेम करतोय तिच्यावर! खूप ...खूऽप प्रेम करतोय.

श्रीकृष्ण दीक्षित : आणि तूच तुझी प्रेमाची व्याख्याही सांगितलीअेस मला! युवर लव्ह इन्क्ल्यूड्स हार्ट, ॲज् वेल् ॲज्—

सतीश जोशी हो! — हृदयसुद्धा आणि शरीरसुद्धा!! मी मनानंसुद्धा प्रेम करतोय तिच्यावर आणि देहानंसुद्धा!

श्रीकृष्ण दीक्षित : यू रास्कल्! .. अरे, माझ्या बायकोबद्दल बोलतोअेस तू हे!! आणि माझ्याशी बोलतोअेस!!! हे बोलताना तुला काहीच? ...

सतीश जोशी नाही, काहीच वाटत नाही !! काय वाटायला हवं? तुझ्याशी बोलायला मला कसली लाज, कसली शरम वाटायला हवी? तू जर मीच आहेस, मी जर तूच आहे, तू आणि मी जर वेगळे नाहीच आहोत, तुझ्या-माझ्यात जर द्वैतच नाहीये, तर—

श्रीकृष्ण दीक्षित शब्द–शब्द–शब्द! ... काही तरी जड-अवघड शब्द, वेगळे-निराळे शब्द,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फालतू असंबद्ध शब्द माझ्यावर फेकून मला इंप्रेस् करू बघतोअेस तू ! चिखलात वळवळणाऱ्या किड्याच्या क्षुद्र वासनेला— तुझ्या वासनेला कसलंतरी उदात्त वलय देऊ बघतोअेस तू ! कसलंतरी मायेफिरू अद्वैत शब्दांच्या साखरेत घोळून माझी सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करतोअेस तू ! तुझं घाणेरडं, विद्रुप, वीभत्स, किळसवाणं रूप शब्दांच्या मुलाम्याखाली दडवून-दडवून माझ्या जवळ येण्याचा कावा आहे तुझा ! तुला माझ्या जवळ यायचंय, पर्यायानं ललिताच्या जवळ यायचंय तुला ! ! तुझ्या सडक्या-नासक्या मेंदूतला हा गलिच्छ डाव ओळखलाय मी—

सतीश जोशी शी शी ! माझ्या भावनांची इतकी विटंबना करू नकोस श्री ! इतक्या हीन मनाचा मला समजू नकोस तू—

श्रीकृष्ण दीक्षित मग सांग मला— का माझ्याशी ओळख करण्याचा, ओळख वाढवण्याचा प्रयत्न केलास ? का नसलेलं नातं जुळवून आणायची धडपड केलीस ? . का आमच्या प्रसन्न आयुष्यावर तुझं दळभद्री, अशुभ, काळं सावट पसरवू बघतोअेस ? मला ब्लॅक्-मेल् करायचं ठरवलंअेस तू ? का ललिताला ? —

सतीश जोशी उगीच अेक्साइट् होऊ नकोस श्री ! तुला मी पूर्वीच सांगितलंय की तुला त्रास देण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता, तसा तो कधीच असणारही नाही !

श्रीकृष्ण दीक्षित मग हे सगळं का ? कशासाठी ?

सतीश जोशी : राहावलं नाही, म्हणून ! . . . हो, खरंच ! ! आपल्या दोघांमधलं अद्वैत तुझ्याकडे व्यक्त केल्यावाचून राहावेनाच असे असंख्य क्षण मानगुटीवर बसत चालले होते— क्षणभरही पिच्छा न सोडणाऱ्या अगणित पिशाच्यांसारखे ! . आणि तुला पहिला फोन केला मी . ! फक्त अेवढंच सांगायचं होतं मला तेव्हा, की तू मी आहेस . . . मी तू आहे ! आपल्या दोघांत अेक अद्वैत आहे . .

श्रीकृष्ण दीक्षित : पुन्हा-पुन्हा त्या शब्दांची ढाल करून लपू नकोस तू मागे ! खरोखर काय आहे तुझ्या मनात, ते सांग—

सतीश जोशी खरं तेच तर सांगतोय, तेच तर सांगितलंय आजवर ! श्री, खरंच तुझ्या-माझ्यात अद्वैत आहे तू-मी वेगळ नाहीच आहोत ! ! तुझं आणि ललिताच लग्न झालं तेव्हापासून तेव्हापासून तू मला कधीच वेगळा वाटला नाहीस, वाटत नाहीस माझ्यापेक्षा ! ! !— हो . . .

श्रीकृष्ण दीक्षित व्हॉट डु यु मीन् अेक्झॅक्ट्ली ?

सतीश जोशी तुमचं लग्न . . . लग्नाला मी हजर होतो मला निमंत्रण नव्हतं, तरी हजर होतो ! . . दूर . . अेका कोपऱ्यात मी उभा होतो . दुर्लक्षित ! ! पण मला फिकीर नव्हती— मी मजेत, अेकदम मजेत होतो ! हो ! ! ! . . . लग्नाच्या वेळी मला तुझ्या जागी मी दिसत होतो.

श्रीकृष्ण दीक्षित : ह्याचा अर्थ—वास्तव नाकारणारा, हवेत चालणारा तू अेक अविचारी, निर्बुद्ध माणूस आहेस !

सतीश जोशी नाही रे ! . . . खरंच, अगदी खरंच . त्या लग्नाच्या वेळी तू मी होतास, किंवा मी तू होतो ! तुला खोटं का वाटतंय— ?

श्रीकृष्ण दीक्षित : कारण ते खरं नाहीये ! ते सगळे मनाचे खेळ, मनाचे चाळे आहेत तुझ्या !

सतीश जोशी : मनाचे खेळ ? मनाचे चाळे ? . . . नाही, नक्कीच नाही ! . . . तसं असतं तर . मला काही अनुभव, इतके खरे, इतके जिवंत, इतके 'माझे' वाटलेच नसते श्री ! तुला सांगतो, कित्येक क्षण असे उपभोगलेयत मी . . की ते माझे नसतानाही माझेच आहेत ! . . . माझे ! ! माझे स्वतःचे ! ! ! . . त्या रात्री . तुमच्या लग्नाच्या रात्री पेडर रोडवरचा तुझा फ्लॅट . . . सातव्या मजल्या-वरचा डाव्या बाजूची तीन नंबरची खिडकी तुझ्या बेड्रूमची नक्की बेड्रूम-चीच ! आत मंद निळा नाइट लॅम्प . . ! मी समोरच्या बस्स्टॉपवर ! . . अेकटाच . . ! ! अेकटक बघत— त्या खिडकीच्या तावदाना-तून झिरपणाऱ्या मंद निळाईकडे . . ! काही वेळानं तो निळा तुकडासुद्धा रात्रीच्या अंधारात विरघळून गेलेला अेकाअेकी ! ! आंत अंधार अंधार . . . आणि त्या अंधारात मी . . . बेड्रूम्मध्ये बेड्वर . . . मी मी आणि . . ललिता

श्रीकृष्ण दीक्षित : सऽतीऽऽश . . जोऽशीऽऽ . . . !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी हो . . . त्यावेळी, त्या ठिकाणी तू नव्हतासच ! मी होतो तो ! ! तुझ्या रूपातला मी होतो तो ! . . कदाचित तुझ्या शरीराच्या रूपातला मी होतो ! ! . . तू म्हणजे शरीराच्या रूपातला मीच आहे, माझं शरीर तू आहेस श्री . ! ! मी माझं मन ललितावर प्रेम करतंय ते अेका पातळीवर भावनिक पातळीवर ! . . . आणि दुसऱ्या पातळीवर तुझ्या रूपाने माझंच शरीर तिच्याशी . . .

श्रीकृष्ण दीक्षित : ओऽह्, स्टॉप् इट् नाऊ ! स्टॉप इट् !

सतीश जोशी क्षमस्व मित्रा, माझ्या बोलण्याचा तुला काही त्रास झाला असेल, तर माफ कर मला ! पण तुला कुठल्याही प्रकारे दुखवण्याचा, त्रास देण्याचा माझा हेतू नव्हता, नाहीये! फक्त, आपलं अद्वैत तुझ्याजवळ व्यक्त केल्यावाचून मला रहावलं नाही, म्हणून . . ! पण पुन्हा अेकदा क्षमा मागतो तुझी ! . . आणि ललिताच्या बाबत माझ्याकडून काही कमी अधिक बोललं गेलं असेल, तर तिचीही क्षमा मागतो ! . . ललीऽ . . . ललीऽऽ . . तिला माझ्या वतीनं अेकच सांगायचं फक्त "ललीऽ, मी तुझ्यावर प्रेम करतोय . . खूऽप प्रेम करतोय मला हे प्रेम करीत राहू दे . . . माझी आणखी काहीच अपेक्षा नाही . . काहीही नाही . . "

श्रीकृष्ण दीक्षित (भारावलेला) . . सतीश . . . सतीश जोशी . खरंच, प्रेम खरंच असं असू शकतं ? —— इतकं अनासक्त, इतकं अनाभिलाषी.

सतीश जोशी अनासक्त ? अनाभिलाषी श्री, तुला वाटतयं तसं, तुला वाटतयं तितकं माझं प्रेम अशरीर नाहीच आहे ! खरंच नाहीये ! ! तुला अजून कसं समजत नाहीये की मी . मी तू आहे, तू मीच आहेस ! ! तुझ्या शरीराच्या रूपानं मीच ललिताशी अेकरूप होत असतो . शरीरानं ! . . तिथे तू नसतोस, मीच असतो श्री, मीच असतो ! तुला रं नाही वाटत हे ?

श्रीकृष्ण दीक्षित : का खरं वाटेल ? . कसं खरं वाटेल ? कारण तू म्हणतोस ते शक्यच नाही . कधीच शक्य नाही ! . . पुन्हा सांगतो—— तो सगळा तुझ्या मनाचा खेळ आहे, स्वप्न रंजनात रमण्याचा चाळा आहे तुझा ! ! . . . कदाचित् मानसिक विकृती आहे ती—— हो, विकृतीच ! ! !

सतीश जोशी मला तुझं नवल वाटतंय श्रीकृष्ण दीक्षित ! . . . तुला अजूनही माझ्या हृदयाची गाणी का अकू येत नाहीयेत ? . . आपली दोघांची वेव्हलेंग्थ अेक असूनही ती गाणी का पोहोचत नाहीयेत तुझ्यापर्यंत ? श्री, तुझ्या-माझ्या दोघांच्याही हृदयाच्या गाण्यांचा प्रत्येक शब्द 'ललिता' आहे, प्रत्येक सूर 'ललिता' आहे. धृपद . . . अंतरा . . प्रत्येक आरोह . . . प्रत्येक अवरोह 'ललिता' आहे . . . . हृदयाच्या त्या गाण्यांचं संगीत सजवणारी प्रत्येक सतार-तार झंकारत असते——'ललिताऽ . . ललिताऽ' त्या गाण्याच्या वाद्यवृंदातल्या प्रत्येक बासरी-च्या स्वरसरीतून बरसत असतो 'ललिताऽ . . ललिताऽ . . .' हाच मंजुळ नाद . . .

श्रीकृष्ण दीक्षित बऽस् ! तुझ्या ह्या शब्दांखाली मला गुदमरल्यासारखं व्हायला लागलयं ! तुझे शब्द, तुझी भाषा समजतच नाहीये मला ! पण तरी . . ती हृदयाची गाणी अंधुक-अस्पष्ट कुठेतरी जाणवताअेत . पण तरी सुद्धा नेमकी, नक्की, पक्की पोहोचत नाही येत कानापर्यंत—— !

सतीश जोशी नाहीच पोहोचणार ! ती काना-पर्यंत पोहोचणारच नाहीत श्री ! हृदयाची गाणी अैकायला हृदयाचेच कान हवेत ! तू वेव्हलेंग्थ जुळवून बघ——

श्रीकृष्ण दीक्षित वेव्हलेंग्थ——वेव्हलेंग्थ—— वेव्हलेंग्थ ! तुझ्या ह्या शब्दाला वैताग-लोय मी ! . हृदयाची वेव्हलेंग्थ म्हणे हृदयाची वेव्हलेंग्थ ! सतीश जोशी, तू वेडा झालाअेस—— जाऊ नये इतका आहारी गेलाअेस तू प्रेमाच्या ! तुझ्या जाणीवाच बधीर झाल्याअेत, म्हणून काहीतरी असंबद्ध बोलतोअेस तू !

सतीश जोशी अजूनही तू समजू शकत नाहीयेस मला काय म्हणायचंय ते ? आता आणखी किती शब्दांचे पर्वत उभे करू तुझ्यापुढे ? कोणत्या शब्दांत तुझ्या संज्ञेची समजूत घालू ?

श्रीकृष्ण दीक्षित तुझे शब्द फक्त शब्द आहेत ! अर्थ नसलेले, आशय नसलेले ! ! अशा पोकळ शब्दांचे पर्वतच काय, आभाळभर ग्रहगोलही फोल आहेत——

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी अेक छोटीशी गोष्ट सांगतो तुला. . . खूप खूप वर्षांपूर्वी . . . अेका गरीब मुलाला यक्षानं वरदान दिलं की—"सात अरण्यं, सात वाळवंटं, सात पर्वत आणि सात समुद्र पार करून आठव्या महासागरातला अेक विशिष्ट चिंतामणी मिळव, तू पृथ्वीचा अधिपती होशील ! . . " मोठ्या हिंमतीनं तो गरीब मुलगा निघाला. सात अरण्यं पार केलीत, सात वाळवंटं मागे टाकलीत. . सात डोंगरं ओलांडलेत. . सात समुद्र पोहून आठव्या महासागरात पोहोचला. . . त्या महासागराचं आधिपत्य करणाऱ्या सुसरीला त्याचा येण्याचा हेतू समजला. . .सुसर त्याला म्हणाली—"मी तुला तो चिंतामणी देईन, फक्त अेकच अट— तू तुझ्या आईचं हृदय कापून मला आणून द्यायचंय !—" गरीब मुलगा परत निघाला— सात समुद्र, सात पर्वत, सात वाळवंटं, सात अरण्यं— असा उलट प्रवास करून पुन्हा घरी आला. . . आईचं हृदय कापून काढलं आणि निघाला परत सुसरीकडे . . .

श्रीकृष्ण दीक्षित माहीत आहे मला गोष्ट ती ! चालताचालता रस्त्यात तो मुलगा ठेचकाळून पडला, तर आईचं हृदय त्याला म्हणालं—"बाळा, तुला कुठे इजा तर झाली नाही ना ?"

सतीश जोशी करेक्ट ! ही हृदयाची भाषा असते श्रीकृष्ण दीक्षित ! हृदयाच्या भाषेतली हृदयाची गाणीही असतात ! ती अैकण्यासाठी फक्त वेव्हलेंग्थ जुळवून घ्यायची, बस ! . . . आपण रेडिओ लावतो, तेव्हां काय होतं— ?

श्रीकृष्ण दीक्षित : येस् येस् ! . . . समजलं मला सतीश, अगदी नीट समजलं. . तू मी आहेस हे समजलं, मी तू आहे हे समजलं. . सगळं समजलं. . अगदी नीट समजलं. . . . (अंधार . फोनची बेल् . . .उजेड येतो, तेव्हा—काही दिवस गेलेले . . .)

श्रीकृष्ण दीक्षित : हॅलो . . . कोण सतीश जोशी का ? . . कोण ? सेक्रेटरी ? नाही, मी फॅक्टरीवर येणार नाही आज . . . नो नो . . कॅन्सल् द शेड्यूल. .! हो . . .! वर, सतीश जोशींचा फोन आला होता का ? सतीश जोशीचा ! . . व्हॉट द हेल् डु यु मीन् वाय 'सतीश जोशी कोण' ? . . . तुम्हाला सतीश जोशी माहीत नाही ? सतीश जोशी माहीत नाही ? खुशाल विचारता, सतीश जोशी कोण ! . सतीश जोशी— त्याला ओळखत नाही तुम्ही ? ओळखत नाही ? सेक्रेटरी माझ्या आभाळात उगवणारा प्रत्येक तारा सतीश जोशी आहे ! माझ्या पृथ्वीच्या पाठीवरून लहरणारा वारा सतीश जोशी आहे ! . . मला होणारा प्रत्येक भास–आभास सतीश जोशी आहे ! . . . माझा ध्यास, माझा श्वासन्‌श्वास सतीश जोशी आहे ! माझ्या नसानसातून वाहणारं थेंबन्‌-थेंब रक्त सतीश जोशी आहे ! . . . सतीश जोशी मी आहे, मी फक्त सतीश जोशी आहे ! . . . सेक्रेटरी, सतीश जोशी कुठेय ? त्याचा पत्ता काढा. . . त्याला फोन करायला सांगा मला . . . मला भेटायला सांगा त्याला ! गेले आठ दिवस बोलला नाही तो माझ्याशी मला करमत नाहीये त्याच्याशिवाय !— मी अस्वस्थ आहे, बेचैन आहे, काहीच सुचत नाहीये मला ! . . काय ? . . .हॅलो. . . नाही सेक्रेटरी मी फॅक्टरीत येणार नाही म्हणजे नाही ! . . . तुम्ही सतीश जोशींचा फोन आला की लगेच कळवा मला. . . आठवणीनं. . नक्की . . . विसरू नका . . . नाहीतर मी तुम्हांला नोकरीवरून काढून टाकीन—

(फोन ठेवतो . . . दुसरा अेक नंबर फिरवतो) हॅलो . . . टेलिफोन इन्क्वायरी ? . . मी मी श्रीकृष्ण दीक्षित बोलतोय . . . हो . . . मला अेक माहिती हवीय. सतीश जोशीची माहिती . . हॅलो, गेले आठदहा दिवस मी त्याच्या फोनची वाट बघतोय. . हो त्याआधी नेहेमी यायचा त्याचा फोन मला. . . नाव ? . . . सतीश जोशी सतीश . . .हं. नाही, कुठे रहातो माहीत नाही. नोकरीला ? नाही, नोकरीला कुठेय, तेही ठाऊक नाही . . . नाही, नाही— मला काहीच माहिती नाहीये त्याच्याबद्दल ! . . हॅलो त्याला मी बघितलेलंसुद्धा नाहीये आजवर कधीच ! . . . हो, मला बोलायचं आहे त्याच्याशी. . येस् आय मस्ट ! मला त्याचा फोन नंबर द्या, नाहीतर त्याला तरी मला फोन करायला लावा ! . . तुम्ही समजून घ्या जरा .प्लीज् नाही, असं म्हणू नका. . . ! . .तुम्हाला कसं सांगू आता ? मी . मी सतीश जोशी आहे. . . हो, आणि तो मीच आहे ! . . कॉम्प्लिकेटेड नाही, अगदी सरळ बोलतोय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आम्हां दोघांमधे अद्वैत आहे.. मला त्याच्याशी बोलायचंय, त्याला भेटायचंय, हो... नो इन्क्वायरी, आय् ॲम् नॉट जोकिंग ! सीरियस्ली, अगदी सीरियस्ली ... खरंच अगदी .... खरंच हॅलो .... आता तुम्हीच माझी चेष्टा चालवली आहे .... हो, क्रूर थट्टा करताय तुम्ही माझीच ! तुम्हीच मला दिल्लीतली माणसं जोडून दिलीयेत फोनवर ! . शेकडो मैलांवरचं माझं हैद्राबाद ऑफिस् तुम्हीच माझ्या कानांशी जुळवून देता नेहमी ! इंग्लंड ... अमेरिका .. फ्रान्स ... जर्मनी मधल्या, हजारो मैलांवरच्या अपरिचितांशी तुम्हीच माझं संभाषण घडवून आणता ! ... होय ना ? सांगा, होय ना ? मग सतीश जोशीशी का बोलू देत नाही आहात तुम्ही मला ?... तो तर ह्याच शहरात रहातो... तो तर मुळीच परका नाहीये मला ! ... तो तर मी ... मीच आहे ! मला त्याच्याशी बोलायचंय ... मला त्याच्याशी बोलायचंय. प्लीज्.. प्लीज्.. मला सतीश जोशीचा नंबर द्या ... नाहीतर नाहीतर ... मी तुम्हाला नोकरीवरून काढून टाकीन... तुमचा खून करीन मी ... हो ... हो मी मायेफिरू आहे ... वेड लागलयं मला— (अंधार ... फोनची बेल् उजेड येतो, तेव्हां—काही दिवस गेलेले ...)

श्रीकृष्ण दीक्षित : हॅलोऽ...सतीश जोशीच ना ?

सतीश जोशी हो—

श्रीकृष्ण दीक्षित : साल्याऽ...निर्लज्ज– नालायक बेशरम– पाजी ! ..अरे, गेले पंधरा दिवस तुझ्यावाचून तडफडतोय मी तळमळतोय. ठार वेडा व्हायला आलोय... तुला काही लाजलज्जा ? ... माझा काही विचार ? दुष्ट आहेस तू— दुष्ट !

सतीश जोशी काय झालं ?

श्रीकृष्ण दीक्षित : काय झालं, काय–काय झालं ? तुझ्या फोनची वाट बघता बघता जीव जायची वेळ आली—

सतीश जोशी बापरे ! ... पण का रे ?

श्रीकृष्ण दीक्षित का म्हणजे ? माझ्यातला मीच मला पंधरा दिवस भेटला नाही. . माझ्याशी बोलला नाही मी जिवंत तरी कसा राहू ? अं ?

सतीश जोशी नाही म्हणजे तुझं खरं आहे, पण—

श्रीकृष्ण दीक्षित : खरं आहे, म्हणतोस वर ! लाज नाही वाटत ? कुठे मेला होतास ?

सतीश जोशी : मेलो नव्हतो ... नाही, पण मेलोच होतो पूर्ण नाही, अर्धवट मेलो होतो...

श्रीकृष्ण दीक्षित : म्हणजे काय — ?

सतीश जोशी पंधरा दिवस शुद्धीवरच नव्हतो–

श्रीकृष्ण दीक्षित : दारू पिऊन लोळत होतास इतके दिवस ?

सतीश जोशी मी दारू पीत नाही !

श्रीकृष्ण दीक्षित मग— ?

सतीश जोशी गेले पंधरा दिवस दवाखान्यात आहे मी आत्ता दवाखान्यातूनच बोलतोय.

श्रीकृष्ण दीक्षित दवाखाना ! ?..! झालंय काय तुला ?

सतीश जोशी मला काय ठाऊक ? मी डॉक्टर कुठेय ?

श्रीकृष्ण दीक्षित : डॉक्टर काय म्हणताअेत ?

सतीश जोशी अजूनपर्यंत काहीच म्हणाले नाहीत ... पण आज ते कार्डिओग्राफ की काय काढणारेत माझा, आणि मग—

श्रीकृष्ण दीक्षित : का–र्डि–ओ–ग्रा–फ– ! ! !

सतीश जोशी : हो ! मी डॉक्टरांना म्हटलं देखील, की— डॉक्टर... तुम्ही मनुष्याच्या हृदयाची स्पंदनं आलेखणारा कार्डिओग्राम माझ्या हृदयाला जोडा, किंवा पृथ्वीच्या अंतरंगातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म संवेदना टिपणारा सेइस्मोमीटर माझ्या हृदयाला लावा— तुम्हाला आलेख मिळेल तो फक्त ललिताच्या चित्रांचा ! ही यंत्रं चित्रकार नसतील, तर सरळ साध्या भाषेत ती लिहि-तील–ल. .लि. ता ल..लि..ता. ल..लि...ता...! यंत्रांच्या नावां-प्रमाणेच जर त्यांची मातृभाषा इंग्लिशच असली तर ती लिहितील—अेल्..अे..अेल्.. आय.. टी..ये..!..अेल्..अे..

श्रीकृष्ण दीक्षित फालतूपणा सोड ! कार्डिओग्राफ !! ! ...तुला . तुला हार्ट ट्रबल ...! ! !...हार्ट.. ट्र...ब...ल...! ...तू...तू कोणत्या दवाखान्यातून बोलतोअेस ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतीश जोशी   माझ्यासारखा टिनपाट माणूस सरकारी दवाखान्याशिवाय कुठे असणार ?

श्रीकृष्ण दीक्षित : मी आलोच   आलोच मी . . तुझी कुठंतरी अधिक चांगल्या हॉस्पिटलमधे व्यवस्था व्हायला हवीय . . आय् विल् मॅनेज् इट्   आय् मस्ट् . . ! . . . मी आलोच.

सतीश जोशी   इकडे येतोअेस ? — कशाला ?

श्रीकृष्ण दीक्षित   शट् अप् यू—   !
(अंधार . . फोनची बेल्   उजेड येतो, तेव्हां—काही दिवस गेलेले . . .)

श्रीकृष्ण दीक्षित   हॅलो   जसलोक हॉस्पिटल ? मी श्रीकृष्ण दीक्षित . . . डॉक्टर ख्रिश्चन बर्नार्ड् वॉज् टु चेक् माय् पेशंट. . त्यांचा रिपोर्ट काय ?   काऽय ?   हार्ट ट्रान्स्प्लान्ट ? वाटेल तेवढा खर्च करायला मी तयार आहे . . पण सतीश जोशी जगायलाच हवा ! . . . हो ! काय ?   आत्ताच ?   . हृदयारोपण लगेच करायला हवं ?   अदरवाइज् व्हॉट ? तो मरेल ?   नो . . नो . . प्लीज् टेल् द डॉक्टर   की काहीही करा, पण सतीश जोशी जगलाच पाहिजे   अं ? प्रॉब्लेम   ?   मी आहे ना !   . . . येस् आय् मीन् व्हॉट आय् से ! . . . हो, माझं हार्ट येस् . . . माझं हृदय सतीश जोशीला द्या . .   ! काय ? . . . हो, माहीत आहे— मी   मरेन ! वट् आय् ॲम् रेडी ! . .   तुम्हाला समजत कसं नाहीये ?   आफ्टरऑल तो म्हणजे मीच आहे, मी म्हणजे तोच आहे !   हो . .   मी मेलो तरी चालेल आय् विल् डाय फॉर हिम् . . फॉर हिज् लाइफ !   येस्, तुम्हाला हे मान्य नसेल, तर   तर   . आय् विल् किल् मायसेल्फ !   आय विल् शुट मायसेल्फ अँड डाय् ! .   तुम्हाला कळणार नाही हे ! ह्याला अद्वैत म्हणतात   . अद्वैत .   ! ! यू ॲरेंज् फॉर दि ऑपरेशन् !   आय् विल् बी रेडी इन् नो टाइम् !   . रादर . . . आय् ॲम् रेडी राइट नाऊ

. पडदा !

विशेष सूचना

'हृदयाची गाणी   ह्या अेकांकिकेचा कोणत्याही स्वरूपात प्रयोग करण्याआधी लेखकाची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. परवानगीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा :—

सुभाष सोनवणे,
'मातृछाया', टिळकवाडी,
नासिक—४२२००२.

लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरांत, पुरेसा समास सोडून लिहावे. ते मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे. सोबत पुरेसे टपालहशील व स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा असेल तरच नापसंत साहित्य परत पाठविले जाईल. त्या विषयी कोणताही निराळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. कवींनी टपालहशील पाठवू नये. नापसंत कविता निकालात काढल्या जातील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंदिरा संतांच्या काव्यातील विशेषणे : एक अभ्यास

—मीना जोशी

विशेषणे ! व्याकरणातील एक संकल्पना. व्याकरणाचे नाव काढताच कपाळावर उदासजड आठ्यांचे जाळे पसरणाऱ्या लोकांना त्यातील असला एकेक शब्द हिरमुष्टी करतो. पण त्या शब्दावरील रुक्षतेचा बुरखा एकदा का बाजूला सारला आणि काव्यक्षेत्रात शिरले की या विशेषणांना खरेच एखाद्या जरीबुंद शेल्याचे सोनमखमलीपण लाभते. विशेषणे ! स्वत:चे रेखीव, सुस्पष्ट अस्तित्व लाभलेले असूनही दुसऱ्याला भूषविण्याकरिता, त्याला सुव्यक्त करण्याकरिता, कधी त्याला काव्यमय बनविण्याकरिता यांची सदा धडपड. 'स्वार्थी' असूनही दुसऱ्याशी संदर्भित होण्यात समर्पणाचा आनंद मिळविण्याची यांची नित्य तळमळ. खरे तर, काव्यातील आशयाला अर्थसघन व अर्थसुंदर बनवितात ती त्या आशयाशी जडविली गेलेली ही विशेषणेच. आणि म्हणूनच एखाद्या कवीच्या काव्यार्थाच्या गाभाऱ्यात शिरायचे तर या विशेषणांच्या उंबरठ्यांवर नतमस्तक होऊनच शिरावे लागते. उंबरठ्यांप्रमाणेच विशेषणे ही त्या गाभाऱ्याच्या मर्यादरेषा असतात. निमूटपणे, अचूकपणे आणि अलगदपणे रसिकाला गाभाऱ्यात सोडून स्वत:चे अस्तित्व जणू ही विरघळवून टाकीत असतात. सूचक आशयाला टोकेरीपण निर्माण होते तेही या विशेषणांनीच; स्वाभाविकच आशयाचा नेमकेपणा रसिकांच्या मनांत ती उभवू शकतात. त्यांच्या या सगळ्या किमयेमुळेच स्वयंभू आशयाला अर्थाचे खरे 'पुरते'पण लाभते. त्यातून ही विशेषणे जेव्हा भाववेड्या निर्भर मनात फुलपाखरांसारखी नाचू बागडू लागतात, तेव्हा भावांची फुले फुलू लागतात. गंधांनी ती घमघमू लागतात. रंगांनी रंगभरी बनू लागतात.

विशेषणांचे काव्यप्रांतातील हे सामर्थ्य लक्षात आल्यामुळेच आशयाला—भावानुभवांना इतके मुलायम बनविणाऱ्या अशा प्रकारच्या इंदिरा संतांच्या काही सोनसळी विशेषणांचा आस्वाद शब्दांकित करण्याचा येथे प्रयत्न करीत आहे.

इंदिरा संतांच्या काव्यातील विशेषणे ठसठशीतपणे आपले आगळेपण अनेकदा प्रकट करतात. सांकेतिक व पारंपारिक चिरपरिचित अर्थांनी ती कधीच उपयोजिलेली नसतात असे नाही; पण त्याहीपेक्षा अनेकदा त्यांना स्वयंनिर्मितीचे मूल्य असते. याचे प्रमुख कारण असे की ती उपरेपणाने वापरलेली नसतात; तर जेथल्या तेथे अटळपणे आपणहून ती निर्माण झालेली असतात. त्यादृष्टीने ती 'स्व'तंत्र असतात, 'स्व'रूप असतात, अभिनव असतात आणि म्हणूनच रसिकाच्या जीवाला विलक्षण भुरळ घालणारी असतात. आकर्षण हा त्यांचा रसिकाला जाणवणारा एकरूप गुणधर्म असला तरी त्या गुणधर्माचे बहुरंगीपण लक्षात घेण्यासाठी हा लेखनप्रपंच साधीत आहे.

परिचित, नवनिर्मित, परिचितच पण नवसंदर्भित, रंगवाचक, गुणवाचक, सर्वनामवाचक, धातुसाधित, एकेरी, संयुक्त, द्विरुक्त, षष्ठ्यन्तरूप,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विरोधाभासी अशी अनेक प्रकारची ही इंदिरा संतांच्या विशेषणांची दुनिया आहे. या दुनियेच्या परिचयात पूर्वापरक्रम खास असा काही नाही; म्हणूनच या दुनियेला विविधतेने व्यापणाऱ्या त्यांच्या रंगवाचक विशेषणांच्या परामर्शाला अग्रस्थान देत आहे.

रंगवाचक विशेषणे

या सुरंगी विशेषणांना बाईंच्या काव्यात दोन्ही दारांनी प्रवेश असतो. बाहेरच्या प्रमुख दारांनी आत येणारी या प्रकारची विशेषणे वस्तुगत रंगसौंदर्य व्यक्त करण्यासाठी येतात. हे सौंदर्य एक तर निसर्गातील वस्तूंचे असते.

'पोपटपाने हिरवी झाली', 'पिवळी काळी फुलपाखरे', 'हिरवे पिवळे तुरे उन्हाचे', 'निळी कुसुंबी धूसर संध्या', 'हिरवा माळ नी पिवळा मोहर', 'आभाळाचा निळा पारवा', 'सूर्य टाकतो जळात केशर', 'निळे तलम रेशीम, काठावरी सूर्यफुले, भरजरी पदरात, शुभ्र राजहंस खेळे', 'तांबुस मखमल' (माती) या शब्दांतून साजरे होणारे हे निसर्गचित्रण, उन्ह, माळरान, संध्या, आकाश, चांदणे, मेंदी भरल्या नखानखांचे वाळतण, पहाट, एक ना दोन अनेक निसर्गचित्रांतील रंगांची धून आळविणारी ही विशेषणे हिरव्या, पिवळ्या, लालजर्द, निळ्या, जांभळ्या, रेशीमकाळ्या रंगांचे इंद्रधनुष्य निर्माण करतात. मूळच्या सुरेख निसर्गाला लोभसवाणे देखणेपण ती देऊन जातात. नटरंगी विशेषणांच्या येण्याचा हा झाला एक राजमार्ग, जो निसर्गातील वस्तुजात आपल्यापुढे उभे करतो. तर—

'गडद नीलिमा चष्म्यावरचा,
शर्टावरची वटणे काळी
अंगठीतला लाल खडा
अन् बूटावरची उदी झळाळी
पेन मुलायम हिरवट राखी
गडद जांभळे नाजुक पाकिट
पट्ट्यावरचा राजवर्ख अन्
गहन रूपेरी घड्याळ चौकट
रंग रंग हे जमती, भिनती
मीच होतसे इंद्रधनु अन्
तुझ्या जिवाच्या आकाशावर,
अशी सुरंगा रहाते रेलुन'

ही कविता व यासारखे अन्य संदर्भ व्यवहारी जीवनातील रंगीबेरंगी वस्तूंच्या रंगांवरही कवयित्री कशी रेलून राहते व स्वतःच ती जणू इंद्रधनू कशी बनते हे प्रत्ययाला आणून देतात. या प्रकारच्या भावस्थितीत वस्तूविषयींच्या स्मृती रंगांत बुडालेल्या आहेत. या असल्या रंगांना वैयक्तिक संदर्भाच्या वेचकपणाचा अर्थ असतो. रंगवाचक विशेषणांचा काव्यात येण्याचा हा दुसरा राजमार्ग. अर्थात रंगाबद्दलची ही चर्मचाक्षुष जाणीव फक्त कोणा कवीलाच असते असे नसून तुम्हा आम्हा सामान्यांत गणल्या जाणाऱ्या प्रत्येकालाच ती असते. तरीही एक गोष्ट कबूल करावीच लागते की त्यांच्या उपयोगात निरीक्षणाची सूक्ष्मता, तपशिलाची विविधता व अचूकपणा आणि स्मृतीतील साक्षेप इत्यादी गुण नकळत रसिकाला जाणवून जात असतात.

हे मात्र खरे की, या वरील प्रकारच्या विशेषणांहून आतल्या चोर दरवाजांनी अलगदपणे आत्मविश्वासाचे बोट धरून काव्यात येणारी 'सुरंगी' विशेषणे ही अधिकच वेधक असतात. कवीच्या अंतरातून त्यांची निर्मिती होत असल्याने आत्मानुभवाच्या मातीचा सुगंध त्यांना येत असतो. हा गंध रसिकाच्या मनश्चक्षूंना लुटायला मिळतो. ही विशेषणे अशी अगदी आतून येऊन काव्याच्या रंगमंचावर उभी राहतात—ताठपणे, मोठ्या ऐटीत. पत्र टाकून जाण्याकरता रंगमंचावर क्षणिक डोकावून जाणाऱ्या पोष्टमनच्या पात्रासारखी ती काही कामचलाऊ तात्पुरती नसतात. उलट काव्यातील आशयाशी ती एकजीव होऊन अवतरत असतात. आशयाबरोबर सावलीसारखी ती वावरत असतात. या अर्थाने ती खास 'रंगिली' असतात. कवीच्या भावजीवनातून उभवले गेलेले हे अशा प्रकारचे रंग नैसर्गिक रंगांशी आपले अतूट नाते दाखवितातच असे नाही. त्यांना जणू भावजीवनसापेक्ष रासायनिक रंगांचे अस्तित्व असते. प्रतिमानिर्मितीचे सामर्थ्य त्यांच्या या स्वयंभूत्वामुळे त्यांना लाभते; हे त्यांचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणखी एक आगळेपण. पुढील काही उदाहरणे वरील विवेचनाचे मर्म ध्यानी आणून देतील :—

'डोळ्यांमधले लाल धुके', 'लाल विजेचो नादपाखरे', 'हर्ष निळा अन् दुःख गुलाबी', 'पाच फड्यांची काळी नागिण', 'झिमाझिमले डोळ्यांतुन लाल चांदणे', 'प्रश्न झाला निळा, निळा,. . प्रश्न झाला काळा, काळा. . प्रश्न झाला लालजांभळा', 'गंध मनांतील त्याहून हिरवा', 'काळा जाळ', 'निळी धग', 'हिरवे काजळ', 'काहूर तांबडे', 'स्तब्ध निळे मन', 'काळ्या मत्सराची गोण,' 'धुमसत होती विद्युत काळी', 'लाल घुमतो आवाज', 'मायेचा हिरवा हात', 'काळी जाणीव' ही व अशी आणखीही काही उदाहरणे रंगांचा साचेबंद गुण विलकुल व्यक्त करीत नाहीत. इतकेच नव्हे तर येथे व्यक्त झालेल्या धुके, चांदणे, काजळ, गोण, विद्युत इ. कल्पनांना व वस्तूंना मूळचे असणारे अस्तित्वही अभिप्रेत नाही. त्यांना सर्वस्वी स्वतंत्र, त्या त्या संदर्भाशी प्रामाणिक ठरणारा असा आसक्ती, प्रसन्नता, उदासता, मत्सर, अलिप्तता, विरहवेदना इत्यादी भावच्छटांचा वा संवेदनांचा अर्थ आहे. हे दाखविता येणारे व म्हणून दिसणारे रंग नसून ते आस्वादिण्याचे, भावून टिपून घेण्याचे रंग आहेत. त्यांचे अस्सलपण मोठे सुंदर मनोहारी आहे.

रंगवाचक विशेषणांच्या उपयोगाचा तुलनात्मक विचार केला तर सर्वाधिक उपयोग 'काळा' या विशेषणाचा आढळत असून, त्याच्या खालोखाल 'लाल', त्यापेक्षा कमी 'निळा' व 'हिरवा' या शब्दांचा व त्याहीपेक्षा कमी 'पिवळा' व 'पांढरा' या शब्दांचा आढळतो. 'गुलाबी' व 'जांभळा' यांचा वापर तर फारच क्वचित. कवयित्रीच्या भावजीवनाच्या विचाराने या शब्दांच्या कमी जास्त प्रमाणाचे गणित सुटते. इंदिराबाईंच्या वैयक्तिक जीवनात दुःखाला, —विरहदुःखाला अवसर पुष्कळ. औदासिन्य, भग्नता, घुसमटलेपण, थकवा, हतबलता, ओझेपण इत्यादी भावच्छटांनी या भावनेला वेळोवेळी सोबत केलेली. बाईंच्या विरहवेदनेची रंगात्मक जाणीव 'काळा' या विशेषणाने व्यक्त होत राहते. अनेकदा आणि अनेक प्रकारे. काळा, काळा—काळा, काळाशार, काळाभोर, काळाकुंद, कभिन्नकाळा, कभिन्न, कृष्ण, रेशिमकाळ्या, हे त्याचे येण्याचे विविध प्रकार—याशिवाय 'काळोखाची माती', 'अंधाराचे कडे' यासारख्या शब्दांतूनही त्या रंगाची जाणीव उभी करण्याचा प्रयत्न आढळतो तो वेगळाच. त्याचबरोबर रात्र, काळी, चंद्रकळा, डोह, काजळी, बुक्का इत्यादी प्रतिमायुक्त शब्दांतूनही तिचाच प्रत्यय. मात्र तो अप्रत्यक्ष स्वरूपाचा. येथे आढळलेले एक निरीक्षण नोंदवायचे तर असे की वर उल्लेखिलेल्या काळ्या शब्दांशी युक्त इतर शब्दांबरोबर 'काळाकुट्ट' हाही एक संभाव्य पर्याय आहे. पण तो मात्र बाईंच्या काव्यात वापरलेला दिसत नाही. 'क्षण वळवळली पाच फड्यांची काळी नागिण' या आशयात वेदनेत जाणविणारी चैतन्याची डंखयुक्त लसलस उर्मी राहते. 'अंधाराच्या बाळकडूचे काळे पाणी पिऊन वावरताना भावी जीवनाबद्दलच्या अज्ञानाचा अंधार' व त्याचा काळेपणा असा 'अज्ञानमय' अर्थ 'काळा' या विशेषणाने प्रतीत होतो.

आणखी एका ठिकाणी इंदिराबाई म्हणतात—

'मी केव्हाच मिटून गेले आहे
रात्रीच्या कृष्णकमळात'

आपले जीवन जणू मिटले गेले आहे ही त्यांच्या मनाला छळणारी जाणीव येथेच नव्हे तर इतरही कवितांतून अलगदपणे व्यक्त होते. येथेही अशाच अलगदपणे या अर्थसुंदर शब्दांतून ती चित्रित होते. हे मिटणे असले तरी ते सामान्याचे नाही, कविहृदयाचे आहे म्हणून तर 'रात्रीच्या कृष्णकमळात' या सुरेख शब्दांतून ते व्यक्त होत आहे. येथेच नमूद करणे इष्ट ठरेल की काळेपणाच्या या उदासतेच्या विरोधात त्यांच्या काव्यात पांढरेपणाला प्रसन्नतेच्या अर्थापेक्षा वैराग्याचा दाहक अर्थ प्राप्त होतो. आणखी एका ठिकाणी 'मी कधीच जळून गेले आहे. दिवसाच्या पांढ्या वणव्यात' असे त्या म्हणतात. तेथे दिवस—त्याचे प्रकाशमय पांढरे अस्तित्व कवयित्रीला कर्तव्यकठोरतेची जाणीव करून देते असेच म्हणावेसे वाटते. कर्तव्याच्या पसाऱ्यात दिवसा अडकवलेले मन रात्री अधिक अंतर्मुख बनते,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावनात्मक बनते. मग आत बाहेर काळ्या रंगाची सोबत त्याला मिळू लागते.

स्वजीवनाला घेरलेल्या अंधाराचा काळेपणा 'कुंद' हा उदासवाणा शब्द, त्याला जोडून अधिक गहिरा बनतो असे 'काळ्याकुंद भिंतीआडे—आक्रंदते कुणी वेडी' या शद्बांत जाणवते.

एखाद्या वेळी काळोखाचे ओझे कवयित्रीच्या मनावर येते. तिच्या व्यक्तिमत्वाच्या वाचकाला झालेल्या परिचयाच्या प्रकाशात या ओझ्याचा व त्याच्या काळोखाशी असलेल्या संबंधाचा अर्थ झटकन कळू शकतो. या ओझ्याने शिणल्या, थकल्या वृत्तीला डोळ्यांवरही येणारा विखार 'काळा' असणे उचितच वाटू लागते. 'या ओझ्याच्या काळोखाची कवची फुटते' असे म्हणण्यात या थकव्याचे शद्बांकन काळा या शद्बाशी समानधर्मी ठरणारा 'काळोख' हा शद्ब करतो.

'प्रश्न झाला' या शीर्षकाच्या कवितेत प्रश्नात दडलेला आशय व्यक्त करण्याकरिता निळा, काळा, लाल-जांभळा असे विविध रंग बाईंची प्रतिभा निर्माण करते. त्यातील—

'प्रश्न झाला....काळा, काळा,
सोसायास्तव
उत्तरातले
गहन तुफानी गिरिवर,
सागर, अथांग छाया'

या अभिव्यक्तीत काळेपणाचा संबंध सोसण्याशी म्हणजेच वेदनेशी आहे. त्या काळेपणाची तीव्रता गहन आणि अथांग छाया या आणखी दोन शद्बांनी द्विगुणित होते. या रंगांचा आशयाशी किती अभिन्न संबंध आहे तेही ही सर्व कविता वाचताना लक्षात येते.

'सुकलेल्या अश्रूंत कभिन्नशा मेघांच्या राशी' धरण्याच्या भाषेत अध्याहृत असलेल्या काळेपणालाही दु:खानुभवाची जडता आहे. मेघांशी संबंधित होणारा काळा शद्ब अन्य संदर्भात मेघांच्या ठायी असलेले जलपूर्णतेचे वैभव सूचित करतो. येथे त्याचा काही संबंध नाही. दु:खमयतेने जड बनलेल्या या मेघराशी आहेत. आणि त्या कवयित्रीची दीर्घ सोबत करीत आहेत; त्यामुळे त्यांच्या सान्निध्याने अश्रूंचा पूर लोटायच्या ऐवजी ते आता सुकू लागले आहेत. त्यांत या राशी धरण्याचा वेडा — जीवघेणा प्रयत्न ती करते आहे. म्हणून दु:खभाराचे अवजडलेपण येथील 'कभिन्नशा' या शद्बाला स्पर्शिले आहे—

'डोळ्यांच्या काळ्या डोहावर
थरथरले नव्हते पाणी'

हा आणखी एक याविषयीचा लक्षणीय उल्लेख. येथे डोळ्यांना डोहाची प्रतिमा लाभली आहे. डोळ्यांशी डोहाच्या या साहचर्यामुळे एरव्ही डोळ्यांच्यामुळे ध्यानी येणारी त्यांची विभ्रमशील चंचलता वगैरे काहीही न जाणवता मनाला चटकून जाते ती त्यांची खोली, गहिरेपणाची खोली. त्यातून हा डोहही काळा, मग तर त्याच्या गंभीरपणाला आणखीच एक परिमाण लाभते. 'रेशिमकाळ्या डोहावरची' येथेही या डोहाचा संबंध डोळ्यांशीच आहे. काळा डोह, रात्र, अंधार यांच्या वारंवार येण्याचा अर्थ कवयित्रीचे भावजीवन उलगडते असाच याचा अर्थ होत नाही का? बऱ्याच ठिकाणी दु:खाने काळवंडलेले काळेपण त्यांच्या काव्यात आपल्या भेटीस येते. सहसा औदासिन्य, हतबलता प्रकट करणाऱ्या काळ्या रंगाला क्वचित बेहोषीचा अर्थ प्राप्त होतो तेव्हा एक वेगळाच अनुभव येतो—

'इथे वेदना लालतांबडी
बेहोषी अन् येथे काळी'

असे जेव्हा त्या म्हणतात तेव्हा वेदनेचा रंग तांबडा, तर तिच्या बेहोषीचा रंग काळा असल्याचे प्रकट होते. सुखाच्या अतिरेकाप्रमाणेच दु:खाच्या अतिशयत्वाची एक नशा असते. त्या नशेची ही बेहोशी.

इंदिराबाईंच्या काव्यात अनेकवेळा अपरिहार्यपणे येणाऱ्या काळ्या या विशेषणाचे हे भावरंगिलेपण. याचा आणखी एक विशेष त्या विषयीचे विवेचन संपविताना नमूद करावासा वाटतो. तो म्हणजे या विशेषणाचा बहुसंख्य उल्लेख 'मृगजळ' या त्यांच्या काव्यसंग्रहात येतो. विरहदु:खानुभूतीशी अधिक जवळ असलेल्या काळाच्या परिघातल्या कविता 'मृगजळात' आहेत. हे बहुधा त्याचे कारण असावे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वाहुल्या' हा मृगजळानंतर बऱ्याच वर्षांनी प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह. त्यातील 'लांबून दरवळत येणाऱ्या' या एका कवितेत मात्र आतापर्यंत आपण न्याहाळलेल्या 'काळा' या विशेषणाच्या उपयोगांहून सर्वस्वी भिन्न असा वापर आढळतो. नाविन्य म्हणून त्याचा परामर्श येथे आवश्यक वाटतो—

'त्या कोमळ काळोखात
आरामखुर्चीवर
झुलत राहावे निस्तब्ध'

असे सुखसंवेदनात्मक रूपदर्शन या कवितेत आढळते. तिच्यात पुढे—

'कृष्णकमळांचा थवा गजवजून झुलत राहतो
काळ्याशार सुगंधाच्या लाटा चारी बाजूंनी
लहरू लागतात
आणि मीही
संथ — अगदी संथ'

असे प्रकटीकरण आहे. पाखरांच्या, माणसांच्या— सर्वांच्याच दर्शनांचा कंटाळा आलेल्या हळव्या मनाला प्रकाशरेखा असह्य वाटतात व रात्र हवीहवीशी वाटते. त्या रात्रीचा एकान्त सुखद— रम्य भासू लागतो. येथील अभिव्यक्तीत कभिन्न व कुंद असे शब्द काळ्या रंगावरोबर न येता कोमल, काळ्याशार असे शब्द येतात. इतकेच नव्हे तर त्याच्या शेजारी कधी नव्हे त्या सुगंधाच्या लाटाही लहरू लागतात.

काळ्या रंगाआड दडलेली येथील भाववृत्ती गोड आहे — मधुर आहे. एरव्ही त्याच्याशी अन्वित होणारी जीवघेणी — पिळवटणारी भाववृत्ती येथे विलकूल आढळत नाही. अपवादात्मक खरेच, पण अस्सल भाववृत्तीदर्शी असे हे 'काळा' या विशेषणाचे उल्लेखन. इतके अपवादात्मक की जणू काळ्याला काळेपणच उरू न देणारे.

एकट्या 'काळा' या रंगवाचक विशेषणाचा वाईंच्या काव्यातून प्रतीत होणारा अनेकरंगीपणा येथवर विवेचिला. त्याखालोखाल येणाऱ्या 'लाल' रंगवाचकाचाही शोध आता घ्यावयास हवा.

'डोळ्यांमधले लाल धुके, काहूर तांबडे, ओंजळीत जमतात तांवड्या-लाल ठिणग्या, लाल घुमतो आवाज' यातील 'लाल' या विशेषणाचा अर्थ अंत:करणातल्या ठुसठुसणाऱ्या, भळभळणाऱ्या कण्हणाऱ्या वेदनेचा असून 'झिमझिमले डोळ्यांतुन लाल चांदणे' आणि 'लाल विजेची नादपाखरे' यांतील त्याचा अर्थ जीवन जगावेसे वाटणाऱ्या आसक्तीचा — जीवनाबद्दलच्या ओढीचा असावा.

'निळा' या शब्दाबद्दलही असे लक्षात येते की धगीवरोबर निळा रंग जमा त्यांना आठवतो; तसाच मनाच्या स्तब्धतेचा विचारही निळ्या रंगाने त्या प्रतीत करतात. 'निळी धग', 'स्तब्ध निळे मन' हे याविषयीचे उल्लेख. 'हर्ष निळा अन् दु:ख गुलावी' या अभिव्यक्तीतही हर्षाचे सौम्यपण 'निळा' या रंगाने तर दु:खाचे सौम्यपण 'गुलावी' या रंगाने जाणवते. गंमत अशी की हर्षाचा रंग निळा व मौनाचाही रंग निळा असे म्हटले गेले तर त्यातून निश्चितच परस्पर-विरोधी भावच्छटा प्रगट होतात.

'एक आठवण कशी—
निळ्या विजेचे नर्तन'

यासारख्या शब्दावलीतून विजेच्या प्रतिमेत समूर्त होणारी तेजस्विता व दिव्यता अभिप्रेत असली तरी तिच्या ठायीच्या दाहकतेपेक्षा लोभस गोडव्याचा प्रत्यय सूचित करण्याच ध्यास कवयित्रीने वाळगला असावा असे वाटते.

एकंदरीत, वाईंनी आकाशाला लाभलेल्या निळ्या रंगातून अलिप्तता, अनासक्ती, धगीतील सौम्यपण असे विविधत्व प्रकट केले आहे असे म्हणता येते.

'हिरवा' हा रंगवाचक शब्द प्रसन्नता, शीतलता, ताजेपणा, मनाच्या डोळ्यांना जाणवणारी सुखदता या भावच्छटा व्यक्त करण्याकरता येतो. त्या शब्दाचा बराच वापर निसर्गातील प्रत्यक्ष वस्तूंचे हिरवेपण व्यक्त करणारा, मात्र—

'हिरवळीत पावले सुखावतात आणि
त्वचेवर चढतो हिरवा सुगंध' किंवा
'हिरवे काजळ'

हे त्याचे या संदर्भातील विशेष उल्लेख. यातही दुसऱ्या उल्लेखात निसर्गाकडे पाहण्याची शक्ती आणून देणारे काही आकर्षण या अर्थी काजळ या शब्दाशी त्याचा अन्वय जरा वेगळ्याच प्रकारे जोडला गेला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गद्यातील अघळपघळपणा काव्यात चालत नाही, तेथें संक्षेपाला सौंदर्याचा अर्थ असतो. ही विशेषणे बाईंच्या काव्यात संक्षेपजन्य अर्थसौंदर्य निर्माण करतात.

वरील विवेचनाबरोबरच आणखीही तीन चार निरीक्षणे या रंगवाचक विशेषणांसंबंधी येथे देणे इष्ट ठरेल.

त्यांपैकी एक निरीक्षण असे की या रंगवाचक विशेषणांचा एकेरी वापर इंदिराबाईंच्या काव्यात तर अनेकदा केला जातोच, पण त्याचबरोबर त्यांचा द्विरुक्त वापरही काहीवेळा केला जातो. सहेतुकतेनेच तो होत असावा. कोणत्याही शब्दाच्या द्विरुक्तीतून एरव्हीही जो आधिक्यभाव सुचविला जातो, त्याप्रकारचीच अतिशयत्वदर्शनाची भावना ही यामागे असावी 'निळा, निळा;' 'काळा, काळा' यासारखे हे उपयोग होत.

हे अतिशयत्व वा गडदपणा काही वेळा अभ्यस्त शब्दयोजनेनेही साधले जाते. लालभडक, लालचुटुक, हिरवागार, पिवळाधमक, काळाकुट्ट या प्रकारची योजना या संदर्भात आपल्या परिचयाची असते. मौज अशी की बाईंच्या काव्यात भडक, गार, चुटुक, धमक, कुट्ट इत्यादी शब्दांच्या वापराऐवजी 'जर्द' या शब्दाचा ठिकठिकाणी उल्लेख आढळतो. मला वाटते, बाईंना या 'जर्द' शब्दाचे सकारण वा अकारण पण आकर्षण असावे. त्यातही आढळते ते असे की लाल, हिरवा या शब्दांशी तो शब्द अधिक जोडून येतो.

'लाल पऱ्यांची जर्द विमाने', 'जर्द हिरवी शेलारी', 'जर्द किनारी लाल लहंगा', 'धरित्रि हिरवी जर्द', 'जर्द पाकळ्यांचे मौन' हे एतद्विषयक उल्लेख होत.

काळ्या रंगाबरोबर 'कभिन्न' व 'शार' असेही आणखी दोन अभ्यस्त शब्द येत असतात. याविषयीही एक वेगळेपण नोंदता येते. दोन ठिकाणी या बाबतीत 'मेघच का तू कभिन्न काळा' व 'कभिन्नशा मेघांच्या राशि' असे लेखन आढळते. आणि एक उल्लेख म्हणजे याच प्रकारचा पांढराफटक हा शब्द 'फटकपांढरे' या प्रकाराने विपर्यस्त क्रमाने उपयोजिलेला आढळतो. परिचित शब्दप्रयोग नवलाईने वापरण्याचे स्वातंत्र्य, तसेच पद्याच्या लयीकरता त्याची मोडतोड करणे इत्यादी गोष्टी कविप्रतिभासंमत असतात या सत्याचा प्रत्यय यांतून येतो यापरते अन्य काय म्हणता येणार याविषयी !

रंगवाचक विशेषणाचा आणखी एक वेगळा रंग बाईंच्या काव्यात आढळतो तो पुढीलप्रमाणे. रंगवाचक शब्द काही ठिकाणी एका नामाला जोडून येतो. स्वाभाविकच त्या ठिकाणचे त्याचे रूप संमिश्र बनते. 'स्पर्शहिरव्या', 'रेशिम पिवळे', 'रेशिमकाळ्या' या विशेषणात 'स्पर्श' व 'दृक्' या दोन संवेदना एकत्र सरमिसळल्या जातात. अन्यत्र 'मौनानिळ्या', 'स्वप्नपांढऱ्या' यांसारख्या शब्दप्रयोगातील रंगांचे विशेषत्व पूर्वपदस्थ नामांनी सीमित होते.

एकंदरीत, रंगवेडी इंदिरा निसर्गातील रंगांवर जेवढी रेलून राहते, तितकीच कदाचित त्याहून जास्त लोभाने ती भाववृत्तीतील रंगांच्या लड्याही आपल्यापुढे उलगडते.

या 'रंगवाचक्या' विशेषणांनंतर आपण सर्वनामविशेषणांचे स्वरूप न्याहाळू या.

सर्वनाम–विशेषणे :

व्याकरणातील या एका उपप्रकाराचाही मोठा लक्षणीय वापर इंदिराबाईंच्या काव्यात आढळतो. त्यासंबंधीची काही उदाहरणे प्रथम देऊन नंतर त्याविषयीचे विवेचन करणे योग्य ठरेल.

'उशी' ही एक छोटोशी संपूर्ण कविताच पाहा :—

'ती कहाणी. .तीं स्वप्ने
ती आशा. .तीं स्मरणें
तें सारें...
येतें जें मनिं दाटून
घुमसत जें श्वसनांतुन
वितळत जें नयनांतुन
तें सारें...
तें सारें तुजपाशीं ! त्याचप्रमाणे
ते दिवस वहर जाइचे
हे अभाळ भुंडे वघणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या आर्त चांदण्या रात्री
ही काळझोप नच टळणें
ते होते माझे जीवन
ही आता नुसती श्वसनें'

'तोच रस्ता, ते आंगण
तेंच मेंदीचे कुंपण
त्याच झुलणाऱ्या वेली
तेच उत्सुक दालन
त्याच रेखीव पायऱ्या
पुढे सारेच....अनोखे'

'हे कसले जीवन'? हे तर जगणे..जगणे..जगणे
'ते...ते. माझेपण...आपले आपण'

'आता न उरले काही
जे आहे सांगायाचे'
'असे तसे माझे सुख'
'मी ही नाही ती तेव्हांची'

' ते कथ्थक—त्या मुद्रा अन् ते खर्जामधले कंपन'
'त्या एका...आठवणीचा
फास'
'त्या वस्तुंतुन—त्या पाण्यांतुन—दिशादिशांतुन'

हे या प्रकारचे वेगवेगळ्या संग्रहांतील उल्लेख. हे विखुरलेले उल्लेखही एकत्र वाचले तर ध्यानी आणून देतात की एका विशिष्ट प्रकारची भावानुभूती व्यक्त करण्याची बाईंची ही अपरिहार्य अभिव्यक्ती आहे.

या ठिकाणी अन्य कोणत्याच प्रकारची विशेषणे येणे अशक्यच ठरते. येथले अनुभव भूत-वर्तमानाच्या तारेवरील दोन्ही टोके सांधणारे आहेत. या दोन टोकांमधील अंतरच नव्हे तर अंतरंगही कवयित्रीला वारंवार घुसळवून टाकते, पिळवटून टाकते. पूर्वजीवनातील चैतन्याची, सौंदर्याची आजच्या जीवनातील जिवटपणाशी, रुक्षतेशी तुलना करणारे कवयित्रीचे मन वरकांती रुक्ष असणाऱ्या पण यथार्थ अशा 'तो,' 'हा,' 'जे' यांसारख्या सर्वनाम-विशेषणांचा प्रपंच उभा करते. बाईंच्याच एका विशेषणाचा वापर करून लिहायचे तर असे लिहिता येईल की हा सारा प्रपंच मोठा 'प्रसन्नदायक' असतो. एरव्ही साध्या दिसणाऱ्या या विशेषणांना त्यांच्या काव्यात अक्षरशः जेट विमानाची गती लाभलेली असते. त्या गतीमुळे बाईंसकट आपणासर्वांना विलक्षण वेगाने ती भूतकाळात घेऊन जातात.

शब्दांना लाभणारे सौंदर्य वा सामर्थ्य हे पुष्कळदा आशयाच्या रूपांनी त्यांना प्रदान केलेले असते. असेच या बाईंच्या काव्यातील सर्वनाम-विशेषणांचा विचार करता मला वाटते.

या विशेषणांप्रमाणेच षष्ठ्यन्त शब्दांचाही विचार या संदर्भात आवश्यक ठरतो.

षष्ठ्यन्त विशेषणे :

षष्ठ्यन्त शब्द विशेषणांप्रमाणेच वागतात म्हणूनच या कक्षेत त्यांचा विचार करणे योग्य ठरते. अध्यात्माची जांभई, उरिचा स्वप्नचंद्रमा, काळोखाचे मृगजळ, हेमंताचा शेला, उन्हाचे पाटव, स्मृतीचे काजवे, वाऱ्याचे पैंजण, मांडीचा शिकारा, इंद्राचे तोरण, काळोखाची दुलई, रात्रीचे कृष्णकमळ, मनाचे आभाळ, दुःखाचे समुद्र, 'नाही' चा महासागर, 'नको नको' चा आक्रोश, 'पुन्हा कधी' ची सलामी, 'कुठे'हीच्या टोकापाशी, अशी अक्षरशः अनेक उदाहरणे या संदर्भात डोळ्यांपुढे येऊन जातात. ह्यांतील प्रत्येक शब्दसमूह एकेका छोट्या प्रतिमेच्या रूपाचा असतो. त्यातील विशेष्यात प्रतिमेचा मूलभूत घटक शब्द असला तरी अलंकारांहून त्यांना वेगळेपण –प्रतिमापण–निर्माण करण्यास कारणीभूत होते ते त्या विशेष्यामागील विशेषणाचे षष्ठ्यन्त रूपच. विशेषण आधी व विशेष्य नंतर हा मराठी भाषेचा रूढ क्रम या वरील उदाहरणांत पाळला गेला आहे. पण याच्या उलट क्रमानेही असे शब्द येण्याची लकब बाईंच्या काव्यात आढळते. धुके स्मृतीचे, पदर उन्हाचा, जखम मौनाची, हिंदोळे हर्षाचे, मयूर मनाचे, ही या संबंधातील काही उदाहरणे. हा उलट क्रम काव्यातील लयीशी सुलट नाते जोडीत असतो. नाहीतरी अभिजात कविता भाषेच्या प्रकृतीच्या पथ्यापेक्षा आपल्या स्वतःच्या प्रकृतीची पथ्ये पाळण्यातच अधिक तत्पर असते.

क्वचित 'मातीची खोल ओढ', 'गगनाचा एक वेध', 'पाण्याचे गडद मौन', 'अधांतरीचे नीळे तळे' इत्यादी प्रयोगांत षष्ठ्यन्त शब्दापुढे एक गुणविशेषण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येते. ह्या प्रकारचा न्यासही श्रुतिसुभग वाटतो. या प्रकाराला षष्ठयन्त शब्दांचे विस्तारित रूप म्हटले तर स्वप्नशहारे, स्वप्नचंद्रमा, मनवेल, मोरमन, बीज-वादळे, सतारशिपण, अमृतज्वाला, आकाशविडा या शब्दांना त्यांचे विकसित रूप म्हणता येईल.

प्रतिमानिर्मिती करणारी ही षष्ठयन्त विशेषणेही बाईंच्या काव्याची भूषणे आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

आणखी एका वेगळ्या प्रकारची विशेषणे आता न्याहाळू. ही विशेषणे धातुसाधित शब्दांच्या स्वरूपाची असतात.

स्थितिदर्शक व क्रियादर्शक गुण व्यक्त करण्या-करिता ही विशेषणे खूप सहायक ठरतात.

रखरखत्या (डोळ्यांना), धगधगत्या (व्यथांना), झुळझुळता (अंधार), येत्या (यामिनीच्या भाळी), झिमझिमत्या (पावसात), मावळत्या (चंद्रम्याचा), झळंवल्या (आकाशाला), (धुके) उसळत्या (खोल-दरीमधे) इत्यादी शब्द वरील प्रकारची उदाहरणे म्हणून देता येतील.

या विशेषणांची आणखी एक परी त्यांच्या काव्यात आढळते. ती म्हणजे ही विशेषणे काही वेळा एखाद्या नामाशी अन्वित होऊन येतात. हासू-भरल्या, जादूभरल्या, देवभिजलेल्या, रक्तमाखल्या, वीजदाटल्या, धूरभरल्या, ताठताणल्या, तेजसरल्या, छंदभारली यांसारख्या शब्दांत वरील प्रकार आढळतो. ओवीच्या छोटेखानी आकृतिबंधातील इंदिराबाईंच्या काव्याला या प्रकारच्या शब्दरचनेने संक्षेपावरोबर सौंदर्याचा साज चढतो. परिणामदृष्ट्या याच पद्धतीची परंतु व्याकरणदृष्ट्या नाम+विशेषण क्वचित विशेषण + विशेषण या प्रकारात मोडणारी पुढील काही उदाहरणेही याच कक्षेत लक्षात घेण्या-सारखी आहेत. चंद्रहासरी, सोनहासरी, सोन-मखमली, गंधवादळी, मौनमत्त, हिमउजळ, कपट-देखणे, दवताजे, सर्पविषारी, आसूओल्या, रंगविलासी, रंगबावरे, भानमोकळे, धनहिरव्या, वृक्षकमानी, खुळेभाबडे हे अर्थसुंदर शब्द बाईंच्या शब्दनिर्मितीतील सामर्थ्य प्रकट करतात. हे सर्वच शब्द नव्याने निर्माण केलेले आहेत; पारंपरिक नव्हेत. त्या त्या संदर्भातील अर्थाचे नेटकेपण त्यामुळे निर्माण होते. वस्तुतः विशेषण हे नामापूर्वी त्याची विशेष माहिती सांगण्याकरिता येते. अशी ही विशेषणेच येथे कोणा नामाशी अन्वित होऊन येतात. त्यामुळे नाम+ विशेषण व पुढे नाम अशी रचना तयार होते. या प्रकारातील वैयक्तिक लकब वा अभिरुची म्हणून आणखीही दोन गोष्टी उल्लेखण्याजोग्या आहेत. पैकी एक गोष्ट म्हणजे 'सोन' या शब्दावर बाईंचे अकारण की सकारण कोण जाणे पण प्रेम असावेसे दिसते. सोनकाकण, सोनकेळ, सोनमखमली, सोनतुरा, सोनताट, सोनपायरी, सोनपावलं, सोनगीर, सोनवर्खी, सोनपाखरे, सोनसाखळ्या, सोनहासऱ्या, सोनचाफा हे शब्द त्यांतील 'सोन' शब्दातील सुवर्णकांती व लाखमोलीपण या दोन्ही दृष्टीने आकर्षणामुळेच निर्माण झाले आहेत असे म्हणण्यास कोणतीच हरकत नाही. हा 'सोन' शब्द पूर्वपदी येतो तर 'वेडी' हा विशेषणसाधक शब्दही वैयक्तिक हव्यासानेच पण जोड-शब्दातील उत्तरपदी मिरवतो. बाईंच्या काव्यात 'वेडी' हा शब्द जोडून रंगवेडी, स्वप्नवेडी, स्वरवेडी, फुलवेडी, व्रतवेडी, वादळवेडी, आग्रहवेडी, रक्तवेडी असे शब्द येतात. या प्रकारचे शब्द अनेक ठिकाणी येणे ही बावही अभिरुचिदर्शकच म्हणता येईल. दुःखवेगळी, रक्तवेगळे, विश्ववेगळी ह्या शब्दांचा तसेच नीजबंद, डोळाबंद, हवाबंद या शब्दांचाही हाच प्रकार.

संस्कृतप्रचुर रचना ही इंदिराबाईंच्या विद्वत्तेला कठीण नसली तरी प्रवृत्तीला एकंदरीत न मानव-णारीच. स्वयंनिर्मितीचे सामर्थ्य अंगी असलेल्या त्यांच्या शब्दकळेला त्याकडे धाव घेण्याची फारशी जरूरीही भासली नाही. शिवाय कविता भावनिष्ठ व भाव आत्मरत. त्यामुळे सहज मातृभाषेची सावली त्यांना पुरेशी होते. तरी तुरळकपणे चित्रांकित अंबर, क्लान्त मनाला, स्मित अबोध, विदीर्ण वाघुळ, आलोचन नभ, शीर्णफुलांचा, स्वप्नविलिन गिरिमाला असे संस्कृतनिष्ठ उल्लेख आढळतात. आशयाचा गडदपणा वा अर्थगौरव साधण्याचे कार्य त्या त्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठिकाणी ते करून जातात. पण त्यांचे विरळ अस्तित्वही एका परीने बाईंच्या व्यक्तित्वाची ओळख करून देते.

'किती' हे मुळात प्रश्नार्थक विशेषण, एरव्हीही मराठीत 'खूप' या अर्थी वापरले जाते.

इंदिराबाईंच्या काव्यातील या 'किती'चा उपयोगही मोठा मोहक, समर्पक व बोलका वाटतो. त्याचबरोबर अभिव्यक्तीतील त्याचे अपरिहार्यपणही तो जाणवून देतो. खालील काही उदाहरणे वाचताच हे सहज ध्यानी येणारे आहे—

'किती पाहिला किनारा, किती प्याले निळा वारा,'
'किती कडाडली वीज, किती घोंघावला वारा,
किती झपाटले मेघ, किती कोसळल्या धारा.'
'किती कठीण झेलणे, शद्वब्रह्माचे आभाळ
किती कठीण पेलणे, गाढ मौनाचे कल्लोळ,'
'किती सोसले मी तुझे',
'किती स्फुंदले, स्फुंदले,'
'अनंताच्या तारेवर, किती कठीण तोलणे,
असमेच्या त्रिकाळात, किती कठीण नर्तने'

हे सगळे उल्लेख वेगवेगळ्या कवितांतील आहेत. अतिशयत्व जाणवणे या शब्दाने परिणामकारकतेने घडते. त्यातही हा शब्द येताना एकेका ओवीत जणू प्रत्येक चरणात येतो व सगळ्या ओवीला व तीतील आशयाला अतिशयित करून जातो.

या अतिशयोक्तीचे दर्शन घडविण्याचा एक स्त्रीसुलभ आविष्कार 'लाख' वा 'लक्ष' या शब्दांच्या योजनेने त्या काही वेळा साधतात—

'लाख लाख घोकले', 'लाख मोलाच्या घडीची',
'हसरुसव्या लक्ष सरी', 'लाख लाख मोरपिसे',
'गुलवाक्षीचे लाख ताटवे,' 'लक्ष मुठी ओवाळाव्या,'

हे या प्रकारचे उल्लेख. 'लक्ष' पेक्षाही 'लाख' या मराठी शब्दाकडे त्यातही अधिक झुकणे; कोटिकरांनी असा शब्दप्रयोग क्वचितच या संदर्भात येणारा. बाईंची स्त्रीसुलभता या 'लाख' शब्दाप्रमाणेच वात्सल्यभाव व्यक्त करताना येणाऱ्या चिमुकले, इवली, सानुल्या, सानसानुल्या, लाडिकसा, यांसारख्या विशेषणांतून डोकावते.

आशयाची व्याप्ती निश्चित करताना कधी कधी इंदिराबाईंच्या काव्यात एक वा दोन विशेषणांनीही काम भागत नाही अशा वेळी तीन तीन विशेषणे लेवून आशय मोठा ठसठशीत बनतो. हेच पाहा ना—

'शून्य रिकामे विपण्ण दालन',
'हिरवी ओली धुंद धरित्री',
'निळी कुसुंबी धुसर संध्या',
'अधिरे काळे कुंद अभाळहि',
'जर्द विजेचा मत्त केवडा',
'तृप्त सुखाच्या निवांत कुरणी'

यातील पहिल्या उदाहरणात एकार्थी वेगवेगळ्या शब्दांच्या न्यासांनी एकच आशय गडद बनतो, तर कधी रंग, स्पर्श, गंध इ. विविध संवेदनांच्या संमिश्र प्रतिक्रियेचा तो बोलका उद्‌गार ठरतो. ज्ञानेश्वर विशेषणेच विशेषणे देऊन आशयाची सुसंपन्नता जशी रसिक मनावर कोरतात तशीच संपन्नता व धुंदकारी लय बाईंच्या या विशेषणांतून जाणवते.

व्यावहारिकदृष्ट्या विरोधी भासणारे व म्हणून अशक्य वाटणारे शब्द काही वेळा विशेषण-विशेष्य संबंधात येतात. अशा ठिकाणची अर्थविशेषता खूपच सुंदर वाटते. भिजलेली आग, ओल्या तारा, कडवट काळा प्रकाश, उयळपणाची खोली, मुजोर तुरे, कडु मधाने भिनली टपटप, अत्तराचे सूर, सुवास दाहक अग्निफुलांचा, मौनमत्त, अंगाराचे तुरे, पेटे काळोखाचे जळ, प्रसन्नदाहक वसुंधरेची मी तर इवलीलाही, असे एकापेक्षा एक रम्य उल्लेख कवयित्रीच्या मनाला जाणवून गेलेल्या अनेक प्रसन्नदाहक भाववृत्तीशी अत्यंत अचूकपणे व अलगदपणे घेऊन जातात. त्यांचे सौंदर्य अविस्मरणीय असेच आहे.

यासारखाच सुंदर असा विशेषणांचा आणखी एक प्रकार शेवटी लक्षात घेत आहे. तिरसट झाडे, जुलमी कौलार, काळी कुंद भित, माती दुरवरी, कुटुंबवत्सल फणस, चंद्रहासरी कातर पाने, मनस्वी आम्रतरू, मुकी जास्वंद, गाण्यामधला भाव पोपटी, सोनहासरी शेवंती, प्रेमळ अंधार, दुष्ट मुरली, उन्ह

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोमटे, सालस मोठे, हे व असे आणखी शब्द वाचले की लक्षात येते की अचेतनाला सचेतनसापेक्ष गुणविशेषणे लावून चैतन्याची लावण्यवेल काव्याच्या मांडवावर चढविण्याचे मुरब्बी कौशल्य इंदिराबाईंच्या प्रतिभेत ओतप्रोत भरलेले आहे. या शब्दसमूहांना सौंदर्य आहे ते चैतन्यनिर्मितीचे.

रंगवाचक, गुणवाचक, सर्वनामिक, षष्ठ्यन्त, धातुसाधितरूप, संस्कृत, एकेरी, द्विरुक्त, तीन-तिनांच्या संयोगाने येणारी, विरोधी भासणारी, काही खास शब्दांशी युक्त होणारी, चैतन्यनिर्मिती करणारी अशी नानाविध प्रकारची विशेषणे इंदिराबाईंच्या काव्यात कशी, किती व का येतात व ती कोणकोणता भिन्न भिन्न परिणाम साधतात याचे तपशीलवार विवेचन येथपर्यंत केले.

इंदिराबाईंचे अनुभव मोठे उत्कट, तीव्र टोकेरी. हे अनुभव व्यक्त होण्याचा घाट बहुधा ओवीच्या छोटेखानी स्वरूपाचा. ह्या घाटात टोकेरी अनुभव नेटकेपणाने व्यक्त करण्यास उपयुक्त ठरणारा हा विशेषणांचा विविधरूप संसार. विविध, तितकाच वेधक. वेधक तितकाच सार्थ—समर्पक. त्यांच्या काव्यातील अर्थाचे अर्करूपी उत्तर प्रकट करणारी ही विशेषणे अक्षरशः त्यांच्या काव्याला 'गंधवावरे' बनवितात. ती काव्याच्या हातात काव्यात्मकतेचे सोनकाकण बांधतात, म्हणून तर ती रंगभरी-गंधभरी, स्पर्शमुलायम विशेषणे, रसिकांच्या मनात सदैव 'दवताजी रक्तफुलं' बनून राहतात व न संपणारा सदैव वाढता गंधच त्यांच्या मनांत दरवळून टाकतात.

(प्रस्तुत लेखातील उदाहरणे इंदिरा संतांच्या 'शेला', 'मृगजळ', 'मेंदी', 'रंगवावरी' व 'बाहुल्या' या काव्यासंग्रहांतील कवितांतून घेतली आहेत. उदाहरणे बरीच असल्याने प्रत्यक्ष संदर्भ नोंदवून लेखाला अवजडपणा येईल या भीतीने कवितांच्या प्रत्यक्ष नोंदी केल्या नाहीत).

कट्ट्यावर बसून—

कट्ट्यावर बसून—
सारे आयुष्य फुंकता येईल काय ?
सूर्य आहे, तर दिवस आहे
रात्रीच्या व्याख्येसाठी—
तुम्हाला चंद्र नको काय ?

पाण्यावरच्या सावलीसारखी स्तब्धता
वसंतापूर्वीचीही असू शकते.
डोळे उचलून एकदाच
माळरानांना... नद्यानिर्झरांना
निर्वाणाचा शब्द मागून घ्यावा काय ?

नाहीतर.. मग एरवी
कट्ट्यावर बसून
आयुष्य फुंकता येईल काय ?...! !

—कॅस्केड

अनुक्रमणिका
मराठीचा विकास:महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स र ग म

—द. भि. कुळकर्णी

सी. रामचंद्र यांनी अत्यंत प्रासादिक आणि रंजक आत्मचरित्र लिहिले आहे. त्याचे नाव आहे 'माझ्या जीवनाची सरगम.' सी. रामचंद्र यांच्या चाली खूप ऐकल्या आहेत; पण त्यांचे लेखन पाहि-लेले नाही. हे आत्मचरित्र वाचल्यावर असे वाटले की जणू काय लेखन करण्यात ज्याची सारी हयात गेली आहे अशा हाताने हे लेखन झाले आहे !

स्वतःच्या आयुष्यासंबंधी बोलताना माणसे किती बोलघेवडी, हळवी आणि विस्कळित होतात; इथे सी. रामचंद्र, गतकाळमुक्त, मितभाषी, संयमी आणि रेखीव आहेत. हे त्यांना कसे साधले ? ही सफाई, हा रेखीवपणा त्यांना कसा साधला ?

वाङ्मयाची त्यांना कधी गोडी होती असे आत्मचरित्रावरून तरी दिसत नाही; त्यांच्या वाचन-लेखनाचे आत्मचरित्रात निर्देशच नाहीत. मग हे लेखनकसब उपजत प्रतिभेने साधले आहे का ? याचे उत्तर स्वतः लेखकच देऊ शकेल !

भाषा आणि अभिव्यक्ती यांवरील निखळ प्रभुत्वाने 'सरगम' अतिशय वाचनीय झाले आहे. छोटी टीपदार वाक्ये; मधूनच चमकदार विधाने; थोडे पुढे गेल्यावर मागील प्रसंगांचा गोषवारा, स्मृतिरूप निर्देश . . . अशी लेखकाची निवेदनपद्धती आहे. "मी नावाने 'राम' असलो तरी कृष्णा-सारखा दोन मातांचा मुलगा आहे," "वडिलांचा संसार 'बेसुरा' होता असे नव्हे, पण त्यांच्या प्रपंचाचे गाणे 'कणसुरे' होते यात शंका नाही," अशी चमकदार वाक्ये, त्यांचा अतिरेक टाळून, लेखकाने फार परिणामकारक केली आहेत. लेखकाचे वडील अत्यवस्थ असतात; त्यावेळी आपली अवस्था कशी झाली होती हे सांगताना लेखक लिहितो "कितीकिती गोष्टी आठवू लागल्या. याच भाऊंनी माझे लाड केले. याच भाऊंनी मला हौसेने गायनशाळेत घातले. याच भाऊंनी मला लहानपणी आपल्याबरोबर तमाशाला नेले. माझ्या हातून दौलतजादा करविला. याच भाऊंनी मला अवधूत वेषात हाकून दिले. हेच भाऊ वेड्यासारखे माझ्या पाठीमागे आले. याच भाऊंनी दुधासाठी मोठ्या भावाची कानउघाडणी केली." यांपैकी प्रत्येक प्रसंगाचे आत्मचरित्रात आधी चित्रिण येऊन गेलेले असते; या निर्देशामुळे पुनरावृत्ती होत नाही की लेखनाला निबंधाची कळाही येत नाही तर लेखनाशी आपले तादात्म्य, आपली ओळख वाढत जाते त्यातील सहजतेचा आणि अपरिहार्यतेचा अनुकूल परिणाम मनावर होतो.

पण हे लेखन सहज झालेले नाही; ते 'योजना-पूर्वक' झालेले आहे. ही योजना 'लेखन परिणाम-कारक करणे' या हेतूने आलेली नसून आत्म-चरित्राला 'पूर्णता' देण्याच्या हेतूने आलेली आहे : आत्मचरित्र हा प्रकार कबंधासारखा आहे, असे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हटले जाते. अपूर्ण. जन्मबिंदूपासून आत्मचरित्र सुरू होऊ शकते पण मृत्युबिंदूपर्यंत पोचू शकत नाही, असे म्हटले जाते.

खरोखर आत्मचरित्राची पूर्णता कालसापेक्ष नसते, आशयसापेक्ष असते. आत्मचरित्र जन्मबिंदूपासूनच सुरू झाले पाहिजे असे नाही; दोन पिढ्याआधीही ते सुरू होऊ शकते किंवा तारुण्यापासून सुरू होऊन वृद्धापकालात संपू शकते. आत्मचरित्रकार आपले सर्व आयुष्य सांगणार नसतो; तो आपल्या आयुष्याचे सर्वस्व सांगणार असतो.

सी. रामचंद्र यांच्या आयुष्याचे सर्वस्व काय आहे? संगीत आणि नियती आणि वासना! 'अनारकली'तील संगीतरचनेने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले; 'ए मेरे वतनके लोगों' या देशगीताने हजारोंच्या भावना त्यांनी हेलावून सोडल्या. 'सरगम' आपण हाती घेतो ते संगीतकार सी. रामचंद्र यांना जाणून घेण्यासाठीच. लेखकाने आपला संगीतप्रवास इथे सांगितला आहेच; पण विश्लेषणपद्धतीने नव्हे : 'माझे संगीतप्रेम', 'संगीताभ्यासाचे पहिले धडे', 'माझे संगीतगुरू', 'माझे चित्रपट' अशी प्रकरणे येथे नाहीत; असे लेखन केशवराव भोळे यांनी केले आहे व ते उद्‌बोधकही उतरले आहे. सी. रामचंद्र यांची तऱ्हा अधिक 'जीवननिष्ठ' आणि अनौपचारिक आहे. आपल्या आयुष्याचे कप्पे न पाडता त्यांनी आपली संगीतसाधना ओघाओघाने दिली आहे; त्यामुळेच ती अधिक स्वाभाविक आणि वेधक झाली आहे. स्टेशनमास्तरचा हा मुलगा. "स्टेशनमास्तराच्या घरात संगीत कसले ऐकू येणार? गाड्यांचा रुक्ष धडधडाट आणि त्याच्या शिट्यांचा कर्णकटू आवाज हेच तिथले संगीत." मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात; पण पाळण्यात असताना अंगाई ऐकली की सी. रामचंद्र दचकत, रडूभेकू लागत! मग असा हा संगीतविरोधी वातावरणातील संगीतविरोधी मुलगा संगीताकडे वळला कसा? त्याला एक कारण घडले ते शालेय जीवनातील त्याचे अपयश. याचे एकजात सारे विषय कच्चे. ढ मुलगा. कधी शाळेत पास होणे नाही, नेहमी प्रमोट. अशाच अवस्थेत नागपूरच्या सप्रेमास्तरांच्या श्रीराम संगीत विद्यालयात जाऊ लागला; आयुष्यात प्रथमच मास्तरांकडून शावासकी मिळवू लागला. पुढे चढतच गेला. गायन> नाटक> सिनेमा> नट, गायक>संगीतदिग्दर्शक, नागपूर>कोल्हापूर> मुंबई असा हा त्याचा संगीतप्रवास आहे.

या प्रवासाला साथ आहे नियतीची; निदान लेखकाची तशी धारणा आहे. दरिद्री माणूस धनवान होणे, भाविक ब्राह्मणाचे पोर मदिरा-मदिराक्षी-जुगार यांमागे वाहत जाणे... यात लेखकास नियतीचा वाटा दिसतो. नियतीचे यापेक्षाही अधिक तीव्र विलसित 'सरगम'मध्ये दिसते : एका मुलीवर प्रेम केले सी. रामचंद्र यांनी. ते पहिले प्रेम विवाहात परिवर्तित का झाले नाही? तशी इच्छा तर लेखकाची होती. दुसऱ्याशी लग्न ठरल्यावर ती प्रेयसी या प्रियकराला भेटली, हसत हसत म्हणाली, "माझे लग्न ठरले... ब्राह्मणाशी लग्न करायला विरोध केला घरच्यांनी. त्यात तू अगदीच अशिक्षित!" ही नायगाव वस्तीतील मुंबईची गोष्ट. असाच एक मांत्रिक. सी. रामचंद्र यांचे मोठे बंधू त्याच्या नादी लागलेले. त्याच्या थोतांडाला कंटाळून लेखकाने त्याला घराबाहेर काढले, तेव्हा "बावाने राख घेतली आणि आमच्या उंबऱ्यांत विसकटली. एका छोट्या राखेच्या ढिगाऱ्यावर आपल्या हाताचे बोट वर्तुळाकृती फिरवीत तो काही मंत्र पुटपुटला. दातओठ खात खूप तणतणला. अंती कडू जहर शब्दांत गरजला, निःसंतान होईल. या घरात दिवा लागणार नाही, कूळ चालवील असे कुणी राहणार नाही." बाबाची ही शापवाणी पुढे खरीच ठरली! नासक्या नारळानेही असाच कौल पुढे दिला. पु. रा. भिडे या लफंग्या माणसाने दिलेला तडाखाही लेखकास असाच नियतीचा खेळ वाटला.

पण ही नियती नेहमीच आपल्यावर अवकृपा करते असे लेखकास वाटत नाही; हीच नियती स्त्रियांना आपल्याकडे खेचून आणते असे त्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटते ! शंभर माणसांत उठून दिसेल अशी भरदार ऊंची, रसिकता आणि प्रतिभा, चित्रपटक्षेत्रातील वाढते यश, कमीत-कमी कौटुंबिक पाश आणि मुख्य म्हणजे चंदेरी दुनियेतील मुक्त वातावरण. नियतीने त्याच्याकडे स्त्रिया पाठवू नये तर काय ! शिवाय लेखकाचा जात्याच विकारी स्वभाव. आपल्या आयुष्यात आलेल्या अनेक स्त्रियांच्या हकिगती सी. रामचंद्र यांनी सहज सांगितल्या आहेत. "रामचंद्रराव, आज रात्री माझ्याकडे जेवायला याल ?" असे विनविणारी नटमोगरी आणि तिच्या 'आक्रमक' वागण्याने बगलेत पायताणे घेऊन भयभीत पळत सुटणारा राम चितळकर; नायिकेच्या प्रेमापायी 'मिनर्व्हा' मध्ये शेठजीच्या हातचा खाल्लेला मार; 'जयकोडी'च्या रुक्मिणीचे अतर्क्य वागणे–अपरात्री प्रियकराला घरी बोलविणे, मद्रासहून तमिळ भाषेत प्रेमपत्रे लिहिणे आणि हा तिथे पोचल्यावर त्याला आल्या पावली हाकून लावणे; मलबारमधील जॉनसाहेबाची, सात लाखाची धनीण, तरुण पोरगी; चित्रपटक्षेत्रातील अनेक नटचा आणि गायिका; पुढे धर्मपत्नी झालेली बेन.. अशी अनेक स्त्रीचित्रे आणि स्त्रीचरित्रे येथे मोजक्या शब्दांत साकार झाली आहेत. दु:स्वास करणारी सख्खी आई आणि जीवापाड माया करणारी सावत्र आई, मातृवत् प्रेम करणारी कुणाची कोण गोदूताई. अशीही चित्रे येथे आहेत. मरताना वडिलांनी उपदेश केला होता, " मी सांगतो ते ऐक. बाई या जातीवर विश्वास ठेवू नको. शरीराची सारी दारे स्वच्छ ठेव, वरची तीन आणि तळीची तीन. " पण लेखकाने स्वत:च म्हटल्याप्रमाणे तो जात्याच 'फिसलू'. त्याने म्हटले आहे, "समजायला लागल्यापासून माणसाला दोनच गोष्टी सोडत नाहीत. एक दु:ख व दुसरी शराब." त्याच्या संदर्भात आता आणखी एकीचा निर्देश करायला हवा बाई.

संगीतानंद आणि दु:ख, यश आणि अपयश, बाईचे प्रेम आणि बाईचा कावा, नियतीचे ताण आणि नियतीचे ढील. या साऱ्यांतून एक भडक, उद्दाम, जीवनकथा साकार झाली असेल असे वाटते; पण तसे नाही. इथे विकृती नाही, सुलभीकरणही नाही. भडकपणा नाही आणि बेचवपणाही नाही. शांत समजुतदारीने जीवनातील लहानमोठे, बरेवाईट प्रसंग येथे शब्दांकित झाले आहेत. अखेरीस व्यसनाधीनता, कामासक्तता, वैभव हे काहीच लक्षात राहत नाही; लक्षात राहतो तो एक विलक्षण प्रसंग, त्या प्रसंगाचे मोल जाणणारा सी. रामचंद्र : फाळणीनंतर लताने नूरजहाँला फोन केला; फोनवरच दोघींनी एकमेकींना गाणी ऐकविली; दोघींची भेट ठरली. "आणि खरोखरच लता आणि नूरजहाँ एका स्वतंत्र भूखंडावर भेटल्या. त्या भुईच्या जागेवर कुठल्याही राजसत्तेचा अधिकार नव्हता. अमृतसरपासून तीस-पस्तीस मैलांवर कुठेतरी ती जागा होती. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या सीमा एकमेकांना पाहत त्या ठिकाणी आमोरासमोर उभ्या ठाकल्या होत्या. मध्ये एक लहानसा जमिनीचा तुकडा होता. एक झाड होते. थोडी हिरवळ होती. नूरजहाँची गाडी पाकिस्तानच्या सीमेच्या आत उभी राहिली. आमची गाडी भारतीय सीमेच्या आत उभी राहिली. त्या दोन गायिका त्या मुक्त भूखंडावर एकमेकींना उराउरी भेटल्या. त्यांनी एकमेकांना गाढ आलिंगने दिली. धर्म, देश, जाती, पंथ यांपैकी कोणालाच त्या आनंदक्षणात प्रवेश नव्हता. कलावंताच्या जगात हे सारेच गौण होते. ती दोन कलावतींची भेट होती. दोन मैत्रिणींची भेट होती. एकमेकांच्या गुणावर लुब्ध असणाऱ्या दोन कलावेड्या जीवांची ती भेट होती. ती भेट पाहताना दोन्ही देशांचे सीमारक्षक गहिवरले. भारतीयांच्या डोळ्यांत अश्रू ओघळले. पाकरक्षकांच्या डोळ्यांत अश्रू तरारले. त्या दोन्ही अश्रूंची जात एक होती. धर्म एक होता. आभाळ एक होते. भूमीही एक होती. तो सोहळा मी जन्मात कधी विसरणार नाही."

'सरगम'कार सी. रामचंद्र यांची आणि आपली भेट होते तीही अशीच कोणाच्याच मालकीच्या नसलेल्या भूखंडावर !

माझ्या जीवनाची सरगम, सी. रामचंद्र, इनामदारबंधु प्रकाशन, पुणे, १९७७, मूल्य १८-५०, पृष्ठसंख्या डेमी ७+१८७.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी जिवंत आहे

गीत मीच गावे माझे ते जिवंत आहे
सांगतील त्याच्या ओळी मी जिवंत आहे
कोण मी कसा मी आहे का अजून जगतो
हे मला विचारा माझा मी जिवंत आहे
मी कसे जगावे हेही मला सांगणारे
ऐकतील आता सारे मी जिवंत आहे
का फुलू नये श्वासांचे पेटते निखारे
बोलते चिता स्वप्नांची मी जिवंत आहे !

—राजीव प्रभाकर पांडे

भावशून्य माझे अस्तित्व गा !

मीच माझे कैसे करू विसर्जन
तुझीये स्वाधीन जतन ज्याचे
जाहली जाणीव संसारा संगाती
रंगविणे माती भाजोनिया
खेळ खापराचा खेळणे जीवनी
टिकरी फेकोनि सामोरासी
वळे मागेपुढे ढकलीत जावे
आनंद जोडावे लंगडीने
म्हणे हा माधव कैसे म्या सांगावे
भावशून्य माझे अस्तित्व गा—

—मधुकर पारळकर
(माधव)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (दि. १ जुलै १९७७ ते ३१ ऑगस्ट १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१ **कार्यालय व्यवस्थापन**

१.१ विश्वस्त मंडळ सभा दि. १० जुलै ७७ ला झाली. त्यात १९७६–७७ चा जमाखर्च, १९७७–७८ चा अर्थसंकल्प व नवीन हाती घेण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली.

१.२ कार्यकारी मंडळाची सभा (१९७७–७८ ची दुसरी सभा) दि. २४–७–७७ ला सकाळी नऊ वाजता केन्द्रीय कार्यालयात भरली. या सभेत १९७७–७८ चा अर्थसंकल्प मान्य करण्यांत आला, तसेच भंडारा, अमरावती व लाखणी या ठिकाणी उघडण्यात आलेल्या वि. सा. संघाच्या शाखा सभांना मान्यता देण्यात आली.

१.३ संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २४–७–७७ ला दुपारी ४ वाजता संघाध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली झाली. या सभेत १९७६-७७ चा जमाखर्च व १९७७-७८ चा अर्थसंकल्प या प्रमुख बाबींना मान्यता देण्यात आली.

२ **आजीव सभासद**

(१) श्री. देशपांडे, म. के., मुंबई
(२) श्री. चव्हाण, चुन्नीलालभाई, चंद्रपूर
(३) श्री. मामीडवार, जयंत, चंद्रपूर
(४) श्री. बागला, रमेशचंद्र, चंद्रपूर
(५) श्री. जगशेट्टीवार, रा. वि., चंद्रपूर
(६) सौ. देशपांडे, आशावती शिरीष, नागपूर
(७) सौ. देशपांडे, क्षमा, नवी दिल्ली
(८) श्री. देशपांडे, शिरीष आत्माराम, नागपूर
(९) श्री. देशपांडे, उल्हास आत्माराम, नवी दिल्ली
(१०) श्री. सपकाळ, मनोहर केशव, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. पॉप्युलर प्रकाशन रौप्य महोत्सव—ग्रंथ प्रदर्शन

मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशन संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त संस्थेतर्फे राज्यभर ३२ प्रदर्शने आयोजित करण्यांत आली. वि. सा. संघाच्या सहकार्याने पॉप्युलर प्रकाशन संस्थेने ग्रंथ प्रदर्शन दि. १ ते ३ जुलै ७७ पर्यंत भरविले. या प्रदर्शनाला रसिक वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

४ **सांस्कृतिक कार्यक्रम**

४.१ राज्य पुरस्कार-प्राप्त साहित्यिकांचा सत्कार

शासकीय विभागीय ग्रंथालयाचे वाचक व्यासपीठ आणि वि. सा. संघाच्या संयुक्त विद्यमाने शासकीय पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचा सत्कार करण्यात आला. संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर हे अध्यक्षस्थानी होते. पुरस्कार प्राप्त सर्वश्री, प्र. द. भावे, डॉ. वा. वि. मिराशी, प्रभाकर पुराणिक, दिनकर देशपांडे प्रभृतींचा सत्कार करण्यात आला. नागपूर विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. व. वि. कुळकर्णी यांचाही त्यांचा 'मराठीतील कोष वाङमय' या विषयावरील प्रबंध पीएच्. डी. साठी स्वीकृत झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन श्री. राजदेरकर व श्री. वालेकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीपाद जोशी यांनी केले.

४.२ वि. सा. संघाच्या व्यासपीठावरून प्रथमच विदर्भातील नव्या पिढीच्या पाच कथाकारांच्या कथा वाचनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. श्रीपाद जोशी यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात श्री. यशवंत देशपांडे, कु. मीरा कुळकर्णी, श्री. बबन चहांदे, श्री. सुहास कुळकर्णी व कु. चित्रा पांढरकर या कथाकारांनी भाग घेतला. सौ. सुलभा हेर्लेकर यांनी कथाकारांची ओळख करून दिली.

४.३ साहित्य अकादमी व्याख्यानमाला

विविध भाषांतील साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त पुस्तकांचा परिचय करून देण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक समितीतर्फे 'अभिनव व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली. साहित्य अकादमी व्याख्यानमाला या शीर्षकाखालील व्याख्यानाचे पहिले पुष्प, १९७६ चे अकादमी पुरस्कार प्राप्त 'स्मरणगाथा' (ले. गो. नि. दांडेकर) या पुस्तकावर भाषण करून डॉ. सुनील सूभेदार यांनी गुंफले. आकाशवाणी, नागपूर केन्द्राने कार्यक्रमाचे अंश ध्वनिक्षेपित करून सहकार्य दिले.

४–४ **काव्यवर्षा**

'अभिव्यक्ती' या स्त्री लेखिकांच्या संस्थेतर्फे 'काव्यवर्षा' या शीर्षकाखाली 'पावसाळ्यातील कविता' वरील कवयित्रींचे काव्यवाचन झाले. वि. सा. संघाच्या सहकार्याने कुणालाही वाङमयीन कार्यक्रम घेता यावेत या हेतूने श्रीपाद जोशी यांनी जाहीर केलेल्या आवाहनास अभिव्यक्तीने प्रतिसाद देऊन प्रस्तुत कार्यक्रम सादर केला. सौ. सुलभा हेर्लेकर यांनी कार्यक्रमांचे संचालन केले.

४–५ **कलात्मक लघुपट**

गडकरी सभागृहात दि. १९ जुलै रोजी कला केन्द्रातर्फे चित्रकलाविषयक व अन्य काही लघुपट दाखविण्यात आले. प्रा. कावळे व प्रा. मेंदुले यांनी या उपक्रमाचे संयोजन केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४.६ **बालचित्रकलावर्ग :**

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे बालचित्र शिबीर आयोजित करण्यात आले. साने-गुरुजींच्या स्मृतिदिनानिमित्त आठ दिवस चाललेल्या या शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ८ ते १० सकाळी (दर रविवारी) चौदा वर्षापर्यंतच्या मुलांसाठी विनामूल्य चित्रकलावर्ग सुरू करण्यात आले आहेत.

४.७ **संगीत केन्द्र**

संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे चालक, संगीतज्ञ व कलावंत यांच्या एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. वि. सा. संघाच्या संगीत विषयक कार्यक्रमात अधिक नेमकेपणा येण्यासाठी वरील संगीततज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ व्हावा हा हेतू या मेळाव्यामागे होता.

३.७ वार्तालाप

वि. सा. संघाच्या कार्यक्रमांना वृत्तपत्रांतर्फे भरीव सहकार्य लाभत असून सांस्कृतिक समितीचे प्रमुख श्रीपाद जोशी यांनी याबावतीत पूर्ण वार्तालाप वृत्तपत्रीय व्यवसायातील व्यक्तींशी घडवून आणून आगळा कार्यक्रम आयोजित केला.

५ **नैमित्तिक कार्यक्रम**

५.१ दि. १ आगस्ट ७७ ला टिळक पुण्यतिथीनिमित्त लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

५.२ दि. १३ आगस्ट ७७ ला प्र. के. अत्रे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

५.३ दि. १५ ऑगस्ट ७७ ला स्वातंत्र्य दिनानिमित्त संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजाला मानवंदना देण्यात आली.

६ **सन्माननीयांच्या भेटी**

६.१ १२ जुलै ७७ ला माननीय महापौर श्री. अटलबहादूर सिंग यांनी भेट दिली.

६.२ २३ जुलै ७७ ला म. रा. ग्रंथालय विभागाचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ लायब्ररीज श्री. शब्दे यांनी संघास भेट दिली.

६.३ आय. एन. टी. प्रौढ व बालककलाकारांचे साहित्य संघातर्फे स्वागत झाले.

६.४ १३ ऑगस्ट ७७ ला म. रा. साहित्य व संस्कृति मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी भेट दिली.

७ **श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय**

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळातर्फे दि. ३० ऑगस्ट ७७ ला कविवर्य 'बी' (कै. ना. मु. गुप्ते) यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. श्री. मधुकर राजे व चंद्रकांत कुळकर्णी यांनी कवी 'बी' यांच्या काव्यासंबंधी विचार प्रगट करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

८ **संगीत समिती**

८.१ सुप्रसिद्ध गायिका श्रीमती प्रभा अत्रे व पुरवी मुखर्जी यांचा दि. १५ ऑगस्टला सत्कार करण्यात आला.

८.२ श्रीराम संगीत विद्यालयाचे संस्थापक सुप्रसिद्ध गायक कै. पंडित शंकरराव सप्रे यांच्या स्मृती-प्रित्यर्थ श्री. सप्रे यांच्या कुटुंबियांकडून समितीला रु. ३०००/- ची देणगी प्राप्त झाली आहे. या देणगीबद्दल वि. सा. संघ सप्रे कुंटुबियांचा सदैव ऋणी राहील.

नाट्यसमिती

गतवर्षापासून महिलांच्या अभिनय, लेखन आदि कलांना उत्तेजन मिळावे म्हणून वि. सा. संघाच्या नाट्यसमितीतर्फे सुरू करण्यात आलेल्या महिला एकांकिका स्पर्धांचे उद्घाटन यावर्षी दि. १३ व १४ जुलै रोजी धनवटे रंग मंदिरात करण्यात आले. नागपुरातील ८ संस्थांनी त्यात भाग घेतला.

(१) गृहिणी समाज, हनुमाननगर, (२) महिला समाज,रामनगर, (३) राहुल क्रीडा मंडळ, (४) रंजन कला मंदिर, (५) गंधर्व क्रीडा मंदिर, (६) नवरंग, (७) हर्णे महिला समाज, (८) मुक्तिवाहिनी.

स्पर्धेचा निकाल व बक्षीस समारंभ ता. १५ जुलै १९७७ रोजी संध्याकाळी ६ वाजता धनवटे रंगमंदिरात झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. कुंदाताई विजयकर उपस्थित होत्या. सौ. कुंदाताई विजयकर यांनी वि. सा. संघाच्या या उपक्रमाबद्दल संस्थांचे कौतुक केले व वि. सा. संघाचे अभिनंदन केले. अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी पुरुष पात्रविरहित नाटिकांची लेखन स्पर्धा जाहीर केली. सुभाष मंडळाच्या 'सायलेन्स खटला चालू आहे' या नाटिकेचा प्रयोग सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

एकांकिका स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. वामन पात्रीकर, सौ. तारा धर्माधिकारी व सौ. सुमती संत यांनी काम केले. त्यांनी जाहीर केलेला निकाल खालीलप्रमाणे आहे :—

प्रथम पारितोपिक	रंजन कला मंदिर— 'चित्रगुप्त अहो चित्रगुप्त'. फिरती ढाल व वि. सा. संघाचे कै. यशोदाबाई मोरे पारितोषिक रु. ५१/- रोख.
द्वितीय पारितोपिक	महिला समाज, रामनगर—'काही खर नव्हे'. उत्कर्ष कला मंदिर फिरती ढाल व वि. सा. संघ पारितोषिक रु. ३१/- रोख.
तृतीय पारितोषिक	गंधर्व कला मंदिर—'सांत्वन.' वि. सा. संघाचे कै. यशोदाबाई मोरे पारितोषिक रु. २५/- रोख.
उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र	मुक्तिवाहीनीहि 'हा दोष कुणाचा' ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिनय

प्रथम पारितोषिक	सौ. उषा उद्धव–'प्लस मायनस प्लस'. वि. सा. संघातर्फे रोख २५/- रु. व कै. मनोरमाबाई पोतदार पारितोषिक रोख रु. ५१/-.
द्वितीय पारितोषिक	: सौ. लीला कठाळे—'हाक फोडी चांगुणा.' वि. सा. संघ पारितोषिक रु. २०/- व प्रशस्तिपत्र.
तृतीय पारितोषिक	कु. लतिका खांडेकर–'हा दोष कुणाचा' ? वि. सा. संघ पारितोषिक रु. १५/- व प्रशस्तिपत्र.

दिग्दर्शन :

प्रथम पारितोषिक	कु. शुभदा खरे–'चित्रगुप्त अहो चित्रगुप्त'. वि. सा. संघाचे कै. यशोदाबाई मोरे पारितोषिक रु. २५/-.
द्वितीय पारितोषिक	सौ. कुमुद पाठक—'सांत्वन.' वि. सा. संघ पारितोषिक रु. २५/-.

लेखन :

वि. सा. संघाचे लेखन पारितोषिक २५ रु. विभागून	(१) सौ. उषा उद्धव— 'प्लस मायनस प्लस.' (२) सौ. माधवी चोरघडे—'मोहिनी.'

जानेवारी १९७६–७७ मध्ये खोलकुटे नाटयस्पर्धा, कै. डावरे एकांकिका स्पर्धा व बाल नाटय स्पर्धा झाल्या होत्या. त्यातील पारितोषिक विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ याचवेळी झाला. तसेच सौ. सुनंदा शरद कुळकर्णी यांना १९७७–७८ चे मामा वरेरकर स्मृति पारितोषिक रोख रु. १०१/- वि. सा. संघाच्या परीक्षा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या साहित्याचार्य सर्वोच्च उपाधी प्राप्त केल्याबद्दल देण्यात आले.

८–३ नाटयप्रयोग

नाटयसमितीच्या वतीने नागपुरातील मान्यवर नाटयसंस्थांतील निवडक नाटयकलावंतांनी दि. २५ आगस्ट ७७ ला सायंकाळी ७ वाजता धनवटे रंगमंदिरात श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'आम्ही लटिके ना बोलू' या नाटकाचा प्रयोग सादर केला. दिग्दर्शक श्री. रमेश अंभईकर होते.

९ परीक्षासमिती वृत्त :

(१) प्रथम सत्रात पुढीलप्रमाणे एकूण ६०३ परीक्षार्थी सम्मीलित झालेत:—

विद्यालयीन–	४४८
महाविद्यालयीन–	११७
शासकीय–	३८

(२) परीक्षाफल ५ आक्टोबर १९७७ रोजी घोषित होईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(३) आगामी परीक्षा दि. ४ व ५ फेब्रुवारी १९७८ ला होतील. आवेदनपत्रे पाठविण्याची अंतिम तारीख २५ आक्टोबर ही राहील.

(४) शासकीय परीक्षांचा चालू अभ्यासक्रम फक्त फेब्रुवारी १९७८ पर्यंतच राहील. फेब्रुवारी १९७८ पासून शासकीय उच्चत्तर, निम्नस्तर, समकक्ष, प्राज्ञ व प्रवीण परीक्षांचा अभ्यासक्रम शासनाने मंजूर केलेल्या व आक्टोबर १९७७ पासून अमलात येणाऱ्या अभ्यासक्रमाशी एकरूप राहील.

(५) परीक्षाफळ व प्रमाणपत्रे परीक्षार्थ्यांनी आपापल्या केन्द्र व्यवस्थापकांकडून १५ आक्टोबर नंतर घेऊन जावीत.

प्रा. माणिक बैतुले, संचालक.

शाखासभावृत्त

९–१ **अमरावती**

या शाखा सभेची नवीन कार्यकारिणी ७७-७८ सालासाठी निवडण्यात आली ती येणे प्रमाणे :–

अध्यक्ष ॲड. श्रीकांत अनगळ

उपाध्यक्ष प्रा. सौ. प्रभा गणोरकर

चिटणीस प्रा. मदन भट्ट, प्रा. सौ. वसुधा घुरडे

सदस्य प्रा. रमेश लोंढे, श्री. द. न. पितळे, ॲड. म. बा. कसबेकर, श्री. एम. आर. मराठे, प्रा. वी. रंगराव, श्री. शिवा इंगोले, प्रा. सौ. उषा चौधरी व श्री. ववन सराडकर.

९–२ **खामगाव**

या शाखा सभेची ७७–७८ सालातील निवडून आलेले पदाधिकारी खालील प्रमाणे :—

अध्यक्ष डॉ. पु. गो. एकवोटे, उपाध्यक्ष प्राचार्य के. मा. मुनशी, कार्यवाह प्रा. गो. ह. सावजी, सहकार्यवाह सौ. विद्या कावडकर, कोषाध्यक्ष : डॉ. पु. म. पारसनीस.

सदस्य डॉ. ध्या. ह. जावंधिया, श्री. भवरलाल सेवक, प्रा. भी. रा. जहागीरदार व श्री. वि. गो. देशमुख.

९–३ **तुमसर**

येथे संघाची शाखासभा स्थापन होउन एक अस्थायी समिती नेमण्यात आली. या समितीत प्रा. अनिल खंडकर, प्रा. क. ग. भांडे, श्री. प. ब. भुरे, श्री. ल. नी. खंडके व सौ. शांताबाई बावनकर या सदस्यांचा समावेश आहे.

९–४ **भंडारा**

संघ शाखा सभेने दि. १९–८–७७ ला श्री. शेषाश्रमाच्या १८ व्या सांस्कृतिक संमेलनाला उपस्थित झालेल्या साहित्यिक आणि पत्रकार अतिथींचा सत्कार सार्वजनिक वाचनालयात केला. याप्रसंगी श्री शेषाश्रमाचे कार्याध्यक्ष श्री. शिवशंकर सोनकुसरे यांनी संघ संमेलनाच्या योजनेचा शुभारंभ म्हणून श्री. शेषाश्रमातर्फे रु. १०१/– ची देणगी जाहीर केली. केंद्रिय संघाचे उपाध्यक्ष एकवोटे याप्रसंगी उपस्थित होते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९–५ **चिखली**

संघ शाखेची नवीन कार्यकारिणी खालील प्रमाणे निवडून आली. अध्यक्ष : श्री. तु. मा. राजपूत, उपाध्यक्ष : श्री. विनोद म. महाजन, कोषाध्यक्ष : श्री. वा. गो. चौधरी, सचिव : श्री. ज. द. वोंद्रे, सहसचिव : श्री. शंकरलाल छाजेड, सदस्य : डॉ. सौ. सरोज भ. कासारे, श्री. सुरेशभय्या अनमने, श्री. सुधाकर मापारी, श्री. पी. डी. महाजन.

९–६ **यवतमाळ**

संघ शाखेची वार्षिक साधारण सभा दि. १०–४–७६ ला भरली. त्यात १९७६–७७ चा जमा-खर्च व वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आला.

९–७ **लाखनी :**

दि. १८–७–७७ ला संघ शाखेची वार्षिक साधारण सभा भरली त्यात पुढील ७७–७८ सालासाठी पदाधिकारी निवडून आले. अध्यक्ष श्री. व. कृ. हुकरे, उपाध्यक्ष प्रा. प्र. ल. पऱ्हाड, सचिव श्री. द. सा. बोरकर, कोषाध्यक्ष : श्री. मा. गो. वंजारी, सदस्य : सर्वश्री म. रा. नितांर्ते, र. स. गिऱ्हेपुंजे, धनश्याम निनावे, दिगंबर लाखणीकर, पुंडलिकराव तिरपुडे, दिनेश गुप्ता व सौ. प्रतिभा राजहंस.

९–८ **आकोट :**

दि. १२–८–७७ ला संघ शाखेची साधारण सभा भरली. त्यात खालील पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आली. अध्यक्ष : प्रा. गु. मा. सोमवंशी, उपाध्यक्ष : प्रा. वजरंग सरोदे व श्री. रा. पु. वानखेडे, सचिव : रा. श्री. निचळ, सहसचिव श्री. भ्यं. सं. काळमेघ, कोषाध्यक्ष : श्री. भा. वा. लव्हाळे, सभासद डॉ. अविनाश सोमवंशी, श्री. दिनकर पोटे, श्री. रमेश हिराणकर, श्री. अरुण भिडे, श्री. अशोक पिंजरकर, उमरखेड.

दि. १८–८–७७ ला संघ शाखेची साधारण सभा झाली. त्यात पुढील कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्ष : प्रा. रा. रा. चितलांगे, उपाध्यक्ष : श्री. वा. दा. जोशी व डॉ. सोनी, सचिव: प्रा. रा. कृ. कुळकर्णी, सहसचिव : प्रा. द. अ. जोशी व श्री. अ. द. दलाल, कोषाध्यक्ष अ. हृ. पोटे.

सदस्य सर्वश्री य. मा. गंधे, यशवंतराव भीष्म, तु. रा. दादेगावकर, शरद बान्नोरे, मधुकरराव बेदरकर, जयपुरकर, केशवराव भागवान, अंबादास साकळे.

९–९ **दारव्हा :**

दि. १०–७–७७ ला संघ शाखेची साधारण सभा झाली. त्यात खालील कार्यकारिणी निवडून आली. अध्यक्ष : प्रा. कमलाकर, दे. हनवंते, उपाध्यक्ष : श्री. हृ. अ. लेता, कार्यवाह : श्री. प्रमोद मा. नरवडे, सहकार्यवाह : कु. विभावरी देशपांडे, सभासद : प्रा. सौ. महात्मे, सौ. सिंधुताई चौधरी, श्री. मं. शा. बल्लाळ, श्री. ब. ना. एकबोटे (यवतमाळ).

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९–१० वणी

दि. १ जुलै ७७ ला कविभूषण श्री. ब. ग. खापर्डे यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकसभा आयोजित करण्यात आली. दि. १ ऑगस्ट रोजी श्री. ग. य. दळवी, संपादक 'लोकमत' ह्यांची भेट.
दि. ७ ऑगस्टला सुप्रसिद्ध साहित्यिक व कथालेखक श्री. राजा मंगळवेढेकर, पुणे, यांचे कथाकथन 'तंत्र आणि मंत्र' या विषयावर भाषण.
इतर शाखा सभांची वृत्ते हाती आली नाहीत.

परीक्षा-समिती

शासकीय परीक्षा

प्रथम सत्रीय परीक्षाफल व प्रतिवृत्त

(१) प्रथम सत्रात विद्यालयीन ४८८, महाविद्यालयीन ११७, शासकीय ३८ याप्रमाणे एकूण ६०३ परीक्षार्थी सम्मिलित झालेत. त्यापैकी शासकीय परीक्षांचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहे :—

(२) **शासकीय परीक्षा** 'अ' मराठी प्राज्ञ उच्चस्तर.

प्रथम श्रेणी सर्वप्रथम प्रावीण्य संपादन करून **डॉ. प्रकाशचन्द्र बन्सल** उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना रुपये पंचवीस रोख पारितोषिक घोषित करण्यात येत आहे. गुणानुक्रमे अन्य चार प्राविण्य संपादन करून उत्तीर्ण—

२. श्री. ह. म. देशपांडे.
३. श्री. नरेन्द्रकुमार वर्मा.
४. श्री. वे. सु. गुंटीवार.
५. श्री. डी. के. शंकरन्.

प्रथम श्रेणी

श्री. गोविंदकांत वर्मा, श्री. कृ. रामचंद्रन नायर, श्री. दत्तात्रेयेलु दुव्वुरी, रूपमती मेरीकुट्टी जोस, श्री. डी. एस. हिरेमठ, श्री. मोहनलाल भंडारी, श्री. रूद्रसिंह परमार, श्री. कृ. म. चौधरी, श्रीमती त्रैसियाम्मा मथाई, श्रीमती सुमित्रा हेगडे, डॉ. महजरखान, श्रीमती साराम्मा के. यु., श्री. गुलाव गोविंदराम टहिल्यानी, श्री. यदुनाथ शिवदयाल दीक्षित.

द्वितीय श्रेणी

श्रीमती पी. एम. चेलम्पा, श्री. सय्यद अझम अली स. हियाकत, श्रीमती अन्नमा चाको, श्री. पी. के. आर. पिल्ले.

सुविधाप्राप्त

श्री. कृष्णस्वामी रामस्वामी यांना प्रथम प्रश्नपत्रात पुन्हा बसायचे आहे. अन्य प्रश्नपत्रात उत्तीर्ण.

मराठी प्रवीण

'निम्नस्तर'– द्वितीय श्रेणी–कु. विमल गुप्ता सर्वप्रथम, डॉ. कमलाकान्ती बॅनर्जी, कु. वेकेट नरसम परचुरे.

माणिक बेंतुले
संचालक, परीक्षा समिती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ प्रसिद्ध झाला ॥

यातनाघर
एकांकिकासंग्रह : महेश एलकुंचवार
किंमत साडेअकरा रुपये

□

मानसी
कवितासंग्रह
वसंत बापट
किंमत पाच रुपये

□

'गर्भालय' आणि 'लंघनमूर्ती'
दोन लघुकादंबऱ्या : रत्नाकर पटवर्धन
किंमत सतरा रुपये

॥ आगामी प्रकाशने ॥

मातृका
कादंबरी
पुरुषोत्तम शिवराम रेगे

□

सलाम
कवितासंग्रह
मंगेश पाडगावकर

□

सौंदर्यानुभव
समीक्षा
प्रभाकर पाध्ये
(एस्थेटिक्स सोसायटी/मौज प्रकाशन)

॥ छापत आहेत ॥

जहाज
कथासंग्रह
बाळकृष्ण वि. प्रभुदेसाई

□

कांटची सौंदर्यमीमांसा
समीक्षा
रा. भा. पाटणकर

□

ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र
समीक्षा : नवी आवृत्ती
गो. वि. करंदीकर

□

रापण
आत्मवृत्त
प्रल्हाद अनंत धोंड

□

डॉ. पटवर्धन
ऊर्फ माधव ज्यूलियन
चरित्र
द. न. गोखले

॥ मौज प्रकाशन गृह ॥ मौज प्रकाशन खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महिला एकांकिका स्पर्धा



सौ. कुंदाताई विजयकर, उद्घाटक सौ. कमलाताई आंबेकर, आमंत्रक, नाट्यसमिती व डॉ. आष्टीकर



(छाया—अरुण फोटो स्टुडियो)

प्रकाशक—गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर-१२
मुद्रक—क. मा. सावंत, अधीक्षक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ